# महाराष्ट्र विधानसभा

## द्वितीय अधिवेशन, २०२४

---

## अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी

## प्रश्नांची एकूण संख्या - ५०

---

### पुणे येथे रेल्वे स्थानक परिसरात स्फोटक सदृश्य वस्तू आढळल्याबाबत

**(१) ४५३२० (३१-१०-२०२२). श्री.अबू आजमी (मानखूर्द शिवाजीनगर) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे येथील रेल्वे स्थानक क्र.१ समोर स्फोटक सदृश्य वस्तू दिनांक १४ मे, २०२२ रोजी वा त्यासुमारास आढळल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर घटना कळताच सर्व यंत्रणा घटनास्थळी दाखल होवून स्फोटक सदृश्य वस्तू मोकळ्या मैदानात नेवून निकामी केली व कोणतीही दुर्घटना घडण्यागोदरच सर्व यंत्रणांनी सतर्कता दाखवल्याने हानी टळल्याचे निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त रेल्वे स्थानक परिसरात स्फोटक सदृश्य वस्तू आढळल्याने देश विघातक कृत्य करणाऱ्यांच्या रडारवर पुणे असल्याचा प्रश्न उपस्थित होत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, या प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीनुसार त्यात काय आढळून आले आहे,

(५) असल्यास, याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१०-०१-२०२४) :** (१), (२), (३) व (४) पुणे रेल्वे स्थानक परिसरात दि. १३ मे, २०२२ रोजी स्फोटक सदृश्य वस्तू आढळल्याने सदर वस्तूची बॉम्ब शोधक व नाशक पथक तसेच श्वान पथकाकडून तपासणी करण्यात आली असता सदरहू स्फोटकाबाबत निगेटिव्ह सिग्नल असल्याचे दिसून आले. सदर स्फोटकसदृश्य वस्तूमध्ये कोणतीही यंत्रणा (मेकॅनिझम) नसल्याची खात्री करण्यात आली. तथापि, सदर संशयित वस्तूमध्ये इलेक्ट्रिक वायर असल्याने सदरहू वस्तू नष्ट करण्यासाठी सुरक्षितरित्या निर्मनुष्य ठिकाणी नेण्यात येऊन कमी तीव्रतेचे डिटोनेटर लावून आवश्यक ती काळजी घेऊन नष्ट करण्यात आली आहे.

न्याय वैज्ञानिक प्रयोगशाळा गणेशखिंड, पुणे यांनी सदर वस्तू निकामी केल्यानंतरच्या अंशामध्ये पोटॅशियम नायट्रेट, सल्फेट, क्लोराईड आयर्न, अल्युमिनियम पावडर इ. घटक आढळून आल्याचे नमूद केले आहे. सदर स्फोटक सदृश्य वस्तू प्रथमदर्शनी फटाक्याचे अवशेष असल्याचे दिसून येत आसल्याने त्यामध्ये आढळलेले घटक हे फटाक्याच्या दारूमध्ये वापरले जातात का, सदर घटकांमुळे जिवित हानी होऊ शकते का, याबाबत न्याय वैज्ञानिक प्रयोगशाळा, गणेशखिंड, पुणे यांच्यामार्फत पडताळणी सुरू असून पुढील तपास करण्यात येत आहे.

(५) पुणे रेल्वे स्थानक येथे १ पोलीस निरीक्षक, २ सपोनि/पोलीस उपनिरीक्षक व २० पोलीस अंमलदार तसेच आर.पी.एफ. चे पोलीस अधिकारी व अंमलदार, बीडीडीएसचे अंमलदार यांचेकडून दररोज ४ वेळा घातपात विरोधी तपासणी केली जात आहे. त्याचप्रमाणे पुणे जिल्हा व शहर हद्दीतील विविध रेल्वे स्थानकांवर नियमितपणे घातपात विरोधी तपासणी बीडीडीएस पथकामार्फत करण्यात येत आहे.

संबंधित पोलीस स्टेशन परिसरात सीसीटीव्ही मार्फत निगराणी करण्यात येत आहे. पुणे बंडगार्डन पोलीस ठाणेचे अधिकारी व पोलीस अंमलदार तसेच रेल्वे पोलीस यांच्यांकडून बीडीडीएस पथकामार्फत परिसरातील दुकाने/वाहने संशयित वस्तू यांची तपासणी करण्यात येते. विविध रेल्वे स्थानकांवर आवश्कतेनुसार गर्दी व गाड्यांची गर्दी विचारात घेऊन घातपात विरोधी बंदोबस्त अधिक लावण्यात येतो. तसेच, इतर सुरक्षात्मक कारवाई नियमित करण्यात येते.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

---

### वॉटरफ्रंट कन्स्ट्रक्शन प्रा.लि. पुणे. हया कंपनीने बुलढाणा जिल्हयातील कामे प्रलंबित ठेवल्याबाबत

**(२) ४६५२६ (१२-१०-२०२२). श्रीमती श्वेता महाले (चिखली) :** सन्माननीय **मृद व जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बुलढाणा जिल्हयात वॉटरफ्रंट कन्स्ट्रक्शन प्रा.लि. पुणे. हया कंपनीने बनावट कागदपत्रांच्या आधारे घेतलेली कोट्यावधी रूपयांची कामे प्रलंबित ठेवली असून करण्यात आलेली कामे निष्कृष्ट दर्जाची केली आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणी कंपनीवर व दोषींवर कारवाई करणेबाबत दिनांक ६ नोव्हेंबर, २०१५ रोजी झालेल्या तक्रारीच्या अनुषंगाने सहाय्यक मुख्य अभियंता , लघु जल सिंचन (जलसंधारण) पुणे यांनी जा.क्र. दक्षता-२/अमरावती / धा-१८२ /१७५, दिनांक ५ जानेवारी, २०१६ अन्वये अधीक्षक अभियंता लघु सिंचन (जलसंधारण) मंडळ आयुक्त कार्यालय परिसर, अमरावती यांना विषयांकित प्रकरणांची चौकशी करुन सद्यःस्थितीबाबतचा स्वयंस्पष्ट अहवाल अभिप्रायासह तात्काळ सादर करण्याबाबत आदेशीत केले होते, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी करुन अहवाल सादर करण्यात आला आहे काय, अहवालाच्या अनुषंगाने संबंधित दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. संजय राठोड (२९-११-२०२३) :** (१) नाही. हे खरे नाही.

वॅाटरफ्रेन्ट कंन्स्ट्रक्शन प्रा. लि. पुणे यांनी बुलडाणा जिल्हयात १३ कामे मिळाले असून त्यापैकी ०७ कामे भौतिकदृष्टया पूर्ण झालेली आहे. पूर्ण झालेली सर्व कामे ही गुणवत्तापूर्वक असून वेळोवेळी गुणवत्तेच्या चाचण्या घेण्यात आलेल्या आहे तसेच पूर्ण झालेल्या तलावात पाणी साठा होत आहे. उर्वरित ०६ कामांपैकी ०२ कामे ही प्रगतीपथावर असून कामांची वेळोवेळी तांत्रीक दृष्ट्या व गुणवत्तापूर्वक तपासणी करण्यात येत आहे. तसेच ०३ कामे शेतकऱ्यांच्या तीव्र विरोधामुळे काम बंद आहेत व ०१ काम हे जलसंधारण महामंडळाद्वारे रद्द करण्यात आलेले आहे.

(२) होय, हे अंशत: खरे आहे.

तक्रारीतील वॅाटरफ्रंट कंन्स्ट्रक्शन प्रा.लि. पुणे ही कंपनी काम करत असलेली मौजे सारंगवाडी संग्राहक तलाव व पुर संरक्षक योजना ता. चिखली मौजे घारोड साठवण तलाव क्र.१ ता. खामगांव व मौजे भादोला पाझर तलाव ता. बुलडाणा ही कामे अधीक्षक अभियंता, गुण नियंत्रण नागपूर मार्फत चौकशी करण्याकरिता निर्देशीत करण्यात आलेली आहेत. त्यानुसार सदर कामांची उपलब्ध माहिती लेखीस्वरुपात दस्तवेजासह गुणनियंत्रण मंडळ, नागपूर यांना देण्यात आलेली आहे.

(३) दक्षता व गुणनियंत्रक पथक नागपूर यांच्या अहवालानुसार सदर तक्रारीबाबत शासन स्तरावर कार्यवाही सुरु आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

### पार्डी ताड (ता.मंगरुळपीर,जि.वाशीम) येथील अडाण नदीवरील दारयुक्त बंधाऱ्यांचे काम अपूर्ण असल्याबाबत

**(३) ४७७०३ (१५-११-२०२२). श्री.राजेंद्र पाटणी (कारंजा) :** सन्माननीय **मृद व जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पार्डी ताड, (ता.मंगरुळपीर,जि.वाशीम) येथील अडाण नदीवरील दारयुक्त बंधाऱ्याचे काम अपूर्ण असल्यामुळे शेतकऱ्यांना त्यांच्या शेतात ये-जा करण्यासाठी रस्ता नसल्याने या भागातील शेतकऱ्यांनी दिनांक १३ जून, २०२२ रोजी वा त्यासुमारास जलसंधारण विभागाला तातडीने सदरहू काम पूर्ण करण्याबाबत निवेदन देऊन विनंती केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू प्रकरणी संबंधीत कंत्राटदाराकडून किती दिवसांमध्ये सदर अपूर्ण काम पूर्ण करण्याबाबत कोणती उपायोजना केली वा करण्यात येत आहे,
(३) असल्यास, सदरहू प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने उक्त बांधकाम अपूर्ण ठेवल्याबाबत संबंधीत कंत्राटदार व अधिकाऱ्यांविरुद्ध कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. संजय राठोड (३०-११-२०२३) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) व (३) शेतक-यांनी दि.१३ जुन रोजी तक्रार देवून काम पूर्ण करण्याबाबत विनंती केली होती. सदर कामाची मुदत दि.३१.०३.२०२३ पर्यंत होती. सदर बंधा-याचे काम ९० टक्के झालेले असून परंतु पावसाळा सुरु झाल्याने नाल्याला पाणी आल्याने कंत्राटदारास अपुर्ण राहिलेले काम पूर्ण करता आले नाही. उर्वरित काम पाणी कमी झाल्यानंतर लवकरच पूर्ण करण्यात येईल.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यात अवैध शस्त्रांची ऑनलाईन तस्करी होत असल्याबाबत

**(४) ४८५९३ (०१-११-२०२२). ॲड.राहूल कुल (दौंड), श्री.अभिमन्यु पवार (औसा), श्री.जयकुमार गोरे (माण) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात ऑनलाईन पद्धतीने मोठ्या प्रमाणात तलवारी, बंदुका अशा प्रकारच्या अवैध शस्त्रांची तस्करी होत असल्याचे माहे मार्च, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, यामध्ये मोठ्या प्रमाणावर अल्पवयीन मुलांचा तसेच कुरिअर कंपनीचा वापर केला जात आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याप्रकरणाचा तपास करण्यात आला आहे काय, तपासानुसार त्यात काय निष्पन्न झाले आहे,
(४) असल्यास, याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०२-१२-२०२३) :** (१), (२), (३) व (४)

ऑनलाईन पद्धतीने अवैध शस्त्रांची विक्री केल्याप्रकरणी पुणे शहर-१ गुन्हा, अमरावती शहर-२ गुन्हे, पिंपरी-चिंचवड-२ गुन्हे व धुळे-१ गुन्हा असे एकूण ६ गुन्हे या पोलीस घटकांमध्ये दाखल करण्यात आले आहेत.

अवैध शस्त्रांची ऑनलाईन खरेदी-विक्री प्रकरणी दाखल झालेल्या गुन्ह्यांच्या अनुषगाने केलेल्या तपासामध्ये अल्पवयीन मुलांचा सहभाग असल्याचे आढळून आले नाही. तथापि, सदर शस्त्रे पाठविण्याकरिता कुरिअर कंपनीचा वापर केल्याचे तपासामध्ये निष्पन्न झाले आहे.

उपरोक्त पोलीस घटकांमध्ये दाखल ६ गुन्ह्यामध्ये १६ आरोपी निष्पन्न झाले असून ८ आरोपींना अटक करण्यात आली आहे. सदरहू दाखल करण्यात आलेल्या ६ गुन्ह्यामध्ये १४८ तलवारी, १ हवाई शस्त्र व २ कुकरी एवढा अवैध शस्त्रसाठा जप्त करण्यात आला आहे.

सदर गुन्ह्यांपैकी १ गुन्हा “क” फायनल समरी करण्यात आला असून ३ गुन्ह्यांचे दोषारोपपत्र मा. न्यायालयात दाखल करण्यात आले आहे. तसेच २ गुन्हे तपासावर आहेत.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**दापेगाव साठवण (ता.औसा, जि.लातूर) या तलावाच्या बुडीत क्षेत्रात गेलेल्या रस्त्याबाबत**

**(५) ४८९६२ (१२-१०-२०२२). श्री.अभिमन्यु पवार (औसा) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) दापेगाव साठवण (ता.औसा, जि.लातूर) तलावाच्या बुडीत क्षेत्रात तुंगी येथील शेतकऱ्यांचा शेतीस जाणारा रस्ता गेल्याने उक्त गावातील अनेक शेतकऱ्यांना शेतामध्ये जाण्यास रस्ता नसल्याने त्यांची गैरसोय होत असल्याचे माहे मे, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू प्रकरणी शेतकऱ्यांनी शेतात जाण्यासाठी पर्यायी रस्ता देण्याबाबत तहसिलदार औसा जि.लातूर यांच्याकडे दिनांक २५ मे, २०२२ रोजी वा त्यासुमारास निवेदनानुसार मागणी केली आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त मागणीच्या अनुषंगाने शेतकऱ्यांना शेतात जाण्यासाठी पर्यायी रस्ता देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०९-०१-२०२४) :** (१) होय, खरे आहे.

(२) होय, खरे आहे.

(३) शेतात जाण्यासाठी पर्यायी रस्ता देण्याबाबत तहसिलदार औसा जि. लातूर यांच्याकडे दिनांक २५/०५/२०२२ रोजी शेतकऱ्यांनी निवेदन सादर केले आहे. सदर निवेदनाच्या अनुषंगाने, तहसिलदार औसा यांनी दिनांक २४.०६.२०२२ रोजीच्या पत्रान्वये उपअधिक्षक, भूमी अभिलेख कार्यालय, औसा यांना सदर रस्त्याची मोजणी करुन सदर शिवरस्त्याच्या हद्दी व खुणा कायम करुन देण्याबाबत कळविले व सहायक पोलिस निरीक्षक, किल्लारी यांना सदर हद्दी व खुणा कायम करतेवेळी अनुचित प्रकार घडू नये म्हणून आवश्यक तो पोलिस बंदोबस्त पुरविण्याबाबत कळविण्यात आले. तसेच मंडळ अधिकारी, मातोळा यांना दिनांक २४.०६.२०२२ व दिनांक ११.११.२०२२ रोजीच्या पत्रान्वये सदरील रस्ता खुला करुन देण्याबाबत कळविण्यात आले.

त्यानुसार मंडळ अधिकारी, तलाठी व मोजणीदार यांनी दिनांक १७.०४.२०२३ रोजी सदर शिवरस्त्याची मोजणी करुन सदर शिवरस्त्याच्या हद्दी व खुणा कायम करुन शिवरस्ता खुला करुन दिलाअसल्याचा पंचनामा सादर केलेला आहे. सदर पंचनाम्यावर प्रस्तुत प्रकरणासंबधीत निवेदनकर्ते यांच्याही स्वाक्षऱ्या आहेत. मंडळ अधिकारी यांचे दिनांक १५.०६.२०२३ रोजीच्या सद्य:स्थितीच्या अहवालात सदर शिवरस्त्याच्या हद्दी व खुणा कायम करुन रस्ता खुला केला असल्याचे नमुद आहे. उपरोक्त बाबींवरुन सदरचा शिवरस्ता हा खुला केला असल्याचे निदर्शनास येते.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**पुणे, सामाजिक सुरक्षा विभागामार्फत शहरातील अवैध धंद्यांवर कारवाई दरम्यान वरिष्ठ पोलीस निरीक्षकाने आरोपींना शिवीगाळ करत मारहाण केल्याबाबत**

**(६) ४९६७३ (२७-०१-२०२३). श्री.भिमराव तापकीर (खडकवासला) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे, सामाजिक सुरक्षा विभागामार्फत शहरातील अवैध धंद्यांवर कारवाई दरम्यान ताब्यात घेतलेल्या आरोपींना वरिष्ठ पोलीस निरीक्षक यांनी अत्यंत अर्वाच्य शब्दांत शिवीगाळ करत मारहाण केल्याचे माहे ऑगस्ट, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत एका महिलेने केलेल्या तक्रारीची दखल घेत महिला आयोगाने पुणे पोलीस आयुक्तांना संबंधित प्रकरणाचा तपास करण्याचे निर्देश दिले असल्याचे निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, संबंधित अधिकाऱ्याने यापूर्वीही अशाच प्रकारे एका महिलेला बेदम मारहाण केली होती, असे महिलेने केलेल्या तक्रारीत नमूद असल्याचे निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्याअनुषंगाने संबधित दोषीवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०१-१२-२०२३) :** (१), (२) व (३) खरे आहे
(४) या प्रकरणी दि.१७.०८.२०२२ रोजी महिलेने दिलेल्या तक्रार अर्जाच्या अनुषंगाने पोलीस उप आयुक्त, परिमंडल ०१, पुणे शहर यांनी चौकशी केली आहे. चौकशींअंती अपचारी वरीष्ठ पोलीस निरीक्षक यांच्या विरुध्द "देय वार्षिक वेतनवाढ २ वर्षे रोखणे(पूढील वेतनवाढीवर परिणाम न होता)" ही शिक्षा प्रस्तावित करणारी कारणे दाखवा नोटीस बजावण्यात आली आहे.
(५) प्रश्न उदभवत नाही.

---

## बदलापूर (जि.ठाणे) येथील कोंडेश्वर कुंडात चौघांचा बुडून मृत्यू झाल्याबाबत

**(७) ५०६४० (२३-०१-२०२३). श्रीमती यामिनी यशवंत जाधव (भायखळा) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) बदलापूर जवळील कोंडेश्वर येथील कुंडात पोहण्यासाठी गेलेल्या चौघांचा कुंडात बुडून मृत्यू झाला हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याप्रकरणी करण्यात आलेल्या चौकशीत काय आढळून आले आहे ,
(३) असल्यास कुंड पोहण्यासाठी सुरक्षित नसतानाही येथे प्रशासना मार्फत कोणती सुचना लावण्यात आल्या नसल्याने वारंवार अश्या घटना होत आहेत, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, अश्या घटना भविष्यात घडू नयेत म्हणून स्थानिक प्रशासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०२-१२-२०२३) :** (१) होय खरे आहे.
(२) सदर प्रकरणातील मयत इसम हे पाण्यात पोहण्यासाठी उतरले असता त्यांना पाण्याचा अंदाज न आल्याने पाण्यात बुडू लागले त्यावेळी खबर देणारे इसम व त्यांचा साथीदार यांनी मयत यांना वाचवण्याचा प्रयत्न केला तथापि, ते त्यात यशस्वी होऊ शकले नाहीत.
(३) व (४)
सदर ठिकाण सुरक्षिततेसाठी ग्रामपंचायत / शासनामार्फत लोखंडी जाळी मारून पोलचे कंपाऊंड करण्यात आले आहे. सदर ठिकाण धोकादायक असल्याची सूचना फलक / बॅनरवर ठळक अक्षरात लावण्यात आली आहे. कोडेंश्वर या पर्यटनाच्या स्थळी गर्दीनुसार स्थानिक पोलीस स्टेशन मधुन बंदोबस्त तैनात करण्यात येतो
(५) प्रश्न उद्भ्‌वत नाही.

---

## नाशिक जिल्हयातील वैतरणा जलविद्युत प्रकल्पातील अतिरिक्त जमिनी शेतक-यांना परत करण्याबाबत

**(८) ५३२५० (२०-०१-२०२३). श्री.हिरामण खोसकर (इगतपूरी) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नाशिक जिल्हयातील इगतपुरी-त्र्यंबकेश्वर मतदार संघातील वैतरणा जलविद्युत प्रकल्पातील अतिरिक्त जमिनी शेतक-यांना परत करणेबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींनी दिनांक १ ऑक्टोबर, २०२२ रोजीच्या सुमारास मा.उपमुख्यमंत्री, यांच्याकडे लेखी निवेदनाद्वारे मागणी केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त निवेदनानुसार शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (११-०१-२०२४) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) स्थानिक लोकप्रतिनिधींनी दिलेल्या निवेदनाच्या अनुषंगाने केलेल्या कार्यवाहीचा अहवाल खालीलप्रमाणे आहे :-

तत्कालीन मा.मंत्री, जलसंपदा व लाभक्षेत्र विकास यांच्या अध्यक्षतेखाली दि.२९/०७/२०२० रोजीच्या बैठकीत अतिरिक्त ठरलेल्या जमिनीची विक्री जाहीर लिलावाद्वारे करावी व सदर लिलावामध्ये संबंधित शेतकऱ्यांनी सक्रिय सहभाग घ्यावा, असे निर्देश दिले.

वैतरणा जलविद्युत प्रकल्पाकडे संपादित जमिनी पैकी अतिरिक्त असलेल्या ६२३.२२ हे. जमीन जाहीर लिलावाद्वारे विक्री करणे करिताचा प्रस्ताव क्षेत्रीय कार्यालयाने जिल्हाधिकारी, नाशिक यांना सादर केला. त्यास अनुसरून उपविभागीय अधिकारी, इगतपुरी-त्र्यंबकेश्वर उपविभाग, जि.नाशिक यांच्या कडून "सदर अतिरिक्त जमिनीची आवश्यकता नसल्याचे व सदर जमिनीची प्रचलित शासन निर्णयानुसार जाहीर लिलावाद्वारे विक्री करण्यास हरकत नसल्याचे" प्रमाणपत्राची मागणी करण्यात आली.

याबाबत कोंकण पाटबंधारे विकास महामंडळाच्या नियामक मंडळाच्या ७९ व्या बैठकीत वैतरणा जलविद्युत प्रकल्पासाठी संपादित केलेल्या जमिनीपैंकी अतिरिक्त असलेल्या ६२३.२२ हेक्टर जमिनीपैकी ०.६० हेक्टर जमीन ही नागोसली ग्रामपंचायत कार्यालय, अंगणवाडी बांधकाम व इतर सुविधांसाठी प्रचलीत रेडी रेकनरनुसार दर आकारून कायमस्वरूपी हस्तांतरित करण्यास व उर्वरीत अतिरिक्त ६२२.६२ हेक्टर जमीन महसूल विभागाचे जिल्हाधिकारी, नाशिक यांच्याकडे हस्तांतरीत करून जाहीर लिलावद्वारे विक्री करणेकामी "ना-हरकत प्रमाणपत्र" देण्यासाठीचा प्रस्तावावर शासनास शिफारस करण्यासाठी मंजूरी देण्यास नियामक मंडळाची एकमताने मान्यता दिली आहे.

याअनुषंगाने प्राप्त प्रस्तावावर शासन पत्र दि. १८.०८.२०२१ अन्वये, अतिरिक्त ठरलेल्या संपादित जमिनी संपादन संस्थेने जिल्हाधिकारी यांच्याकडे वर्ग करण्यासाठी आवश्यक ती कार्यवाही करावी, असे सुचित केले. तद्नंतर वैतरणा जलविद्युत प्रकल्पासाठी संपादित केलेल्या जमिनी परत करण्याच्या विषयाबाबत जिल्हाधिकारी, नाशिक यांच्याकडे दि.२६/०५/२०२३ रोजी बैठक घेण्यात आली. सदर बैठकीमध्ये प्रायोगिक तत्वावर एका गावाचा प्रस्ताव तयार करून तो शासन मान्यतेस पाठविण्याबाबत जिल्हाधिकारी, नाशिक यांनी सूचित केले. सद्यस्थितीत प्रायोगिक तत्वावर मौजे आवळीदुमाला, ता. इगतपुरी, जि. नाशिक या गावातील अतिरिक्त क्षेत्राचा प्रस्ताव उप विभागीय अधिकारी, इगतपुरी-त्र्यंबकेश्वर उपविभाग, नाशिक यांनी दि. १६.०६.२०२३ रोजीच्या पत्रान्वये जिल्हाधिकारी, नाशिक यांच्याकडे सादर केला आहे. सदर प्रस्ताव तपासुन शासनास सादर करण्याबाबत जिल्हाधिकारी, नाशिक यांच्यास्तरावर कार्यवाही प्रगतीत आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## चिपळूण तालुक्यातील वाशिष्ठी नदीतील गाळ काढण्याबाबत

**(९) ५३७६४ (२०-०१-२०२३). श्री.शेखर निकम (चिपळूण), श्री.भास्कर जाधव (गुहागर) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चिपळूण शहरात दिनांक २२ जुलै, २०२१ रोजी वा त्यासुमारास झालेल्या अतिवृष्टीमुळे सुमारे ९० टक्के भाग वाशिष्ठी नदीतील गाळ अनेक वर्ष काढला गेल्या नसल्याने चिपळूण शहर व परिसरातील गांवाचे नुकसान झाले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पुरवणी मागणी नुसार हिवाळी अधिवेशन २०२१ मध्ये वाशिष्ठी नदीचा गाळ काढण्यास मंजूरी मिळून त्यानुसार वाशिष्ठी नदीतील गाळ काढण्यास सुरुवात झाली व पहिल्या टप्प्यातील १०.३१ लक्ष घन मीटर पैकी ८.१० लक्ष घन मीटर इतका गाळ काढल्यामुळे चिपळूण शहराताला २०२२ च्या पावसाळयात कांहीसा दिलासा मिळाला हे ही खरे आहे काय.

(३) असल्यास, उर्वरित दुसरा टप्पा : खेर्डी ते पोफळी व तिसरा टप्पा : गोवळकोट ते भैरवली हे टप्पे पावसापुर्वी गाळमुक्त करणे अत्यंत गरजेचे आहे. परंतु तिसऱ्या टप्प्याच्या भागात सुमारे ४२.७८ लक्ष घनमीटर इतका प्रचंड प्रमाणात

गाळ असल्याने हा भाग सीआरझेड मध्ये येत असून गाळ सर्व्हेक्षण महाराष्ट्र मेरीटाईम बोर्ड महसूल विभागामार्फत करण्यासंदर्भात शासन स्तरावर अद्याप निर्णय झालेला नसल्याने हा गाळ ड्रेझिंगने काढावा लागणार आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, पूरप्रतिबंधक उपाय म्हणून गाळ केव्हापर्यंत काढण्यात येणार असून नदीपात्रातील उर्वरीत गाळ काढण्याची काय तरतूद केली आहे तसेच सन २०२३ च्या पावसात महापुराची समस्या पुन्हा उद्भवू नये म्हणून शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०४-०१-२०२४) :** (१) अंशत: खरे आहे.

दिनांक २२ व २३ जुलै २०२१ रोजी अतिवृष्टीमुळे चिपळूण शहर व परिसरातील गांवांमध्ये पूरपरिस्थिती उद्भवून नुकसान झाले होते. तथापि केवळ नदीतील गाळ न काढल्याने पूरपरिस्थिती उद्भवली हे खरे नाही. अतिवृष्टी व जगबुडी नदीला आलेला पूर त्याचवेळी उधाणाच्या भरतीमुळे दाभोळच्या खाडीतील पाणी फुगून चिपळूण शहर व परिसरातील गांवांमध्ये पूरपरिस्थिती उद्भवली होती.

(२) हे खरे आहे.

(३) व (४) दुसरा टप्पा: वाशिष्ठी नदी चिपळूण जि. रत्नागिरी येथील गाळ व बेटे काढणे टप्पा-२ (खेर्डी मेडीकल ते कॉलेज ते पोकळी) या भागासाठी रु.४.८६ कोटीच्या अंदाजपत्रकास दि.२१.०४.२०२३ रोजीच्या शासन निर्णयान्वये प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात आली आहे.

तिसरा टप्पा: गोवळकोट ते भैरवली यामधील भैरवली ते सोनगाव हे मर्यादित क्षेत्र सागरी विनियम क्षेत्रामध्ये येते. त्या अनुषंगाने शासनाच्या वाळू/रेती निर्गती सुधारित धोरण, २०२२ नुसार महाराष्ट्र मेरीटाईम बोर्ड यांनी जलवाहतूक सुकर करण्यासाठी हातपाटी/डुबी पद्धतीने ३,२७,७३७ घनमीटर गाळ उत्खननाकरिता तसेच महसूल व वन विभागाचे दि. १९.०४.२०२३रोजीच्या वाळू निर्गतीच्या धोरणानुसार यांत्रिकी पध्दतीने गाळ उत्खननाकरिता जिल्हाधिकारी, रत्नागिरी यांना प्राधिकृत केले आहे. यानुसार जिल्हाधिकारी, रत्नागिरी यांचेमार्फत सदर गाळ काढण्याचे काम प्रगतीपथावर आहे.

तसेच सदर क्षेत्रामधील गाळ ड्रेजर पध्दतीने काढण्याकरीता आवश्यक पर्यावरण परवानगी महाराष्ट्र मेरीटाईम बोर्ड प्राधिकरणास प्राप्त झालेली आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## भिवंडी तालुक्यातील मुंबई नाशिक महामार्गावर सरवली ठाकूरपाडा येथील हॉटेल शेरे पंजाब मध्ये डान्सबार सुरू असल्याबाबत

**(१०) ५४७९२ (२७-०१-२०२३). श्री.शांताराम मोरे (भिवंडी ग्रामीण) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भिवंडी तालुक्यातील मुंबई नाशिक महामार्गावर सरवली ठाकूरपाडा येथील हॉटेल शेरे पंजाब मध्ये ऑर्केस्ट्रा च्या नावाखाली डान्सबार सुरू असल्याचे दिनांक २० नोव्हेंबर, २०२२ रोजी निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर बाबतीत भिवंडी गुन्हे शाखेने गुन्हा नोंदवला, हे ही खरे आहे काय,

(३) तसेच भिवंडी महानगरपालिका हद्दिसह ग्रामीण भागातील मुंबई- नाशिक महामार्गावर गोदाम पट्ट्यात सुमारे २३ डान्सबार व अवैध धंदे सुरू आहेत,हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी करुन डान्सबाब व अवैध धंदे बंद करण्याबाबत कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास,विलंबनाची कारणे काय आहेत?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०१-१२-२०२३) :** (१) व (२) होय, हे खरे आहे.

ठाणे शहर पोलीस आयुक्तालय अंतर्गत कोनगाव पोलीस स्टेशनच्या हद्दीत हॉटेल मध्ये महिला बारबाला व महिला

वेटर ग्राहकांशी अश्लील चाळे करून बिभत्स वर्तन करीत असताना मिळून आल्याने कोनगाव पोलीस स्टेशन येथे गु.र.नं. २८५/२०२२, भा.दं.वि. कलम ३४, २९४ अन्वये दिनांक २१.११.२०२२ रोजी गुन्हा दाखल करण्यात आला असून, सदर गुन्हा न्यायप्रविष्ठ आहे.
(३) ठाणे पोलीस आयुक्तालयांतर्गत व ठाणे ग्रामीण जिल्ह्यात एकही डान्सबार नसून, ठाणे पोलीस आयुक्तालयांतर्गत कोनगाव पोलीस स्टेशन व नारपोली पोलीस स्टेशन हद्दीत मुंबई-नाशिक महामार्गावर गोदाम पट्टयात १३ ऑर्केस्ट्राबार आहेत. तसेच, सदर मार्गावर कोणत्याही प्रकारचे अवैध धंदे सुरू असल्याचे आढळून आले नाही.
(४) ठाणे पोलीस आयुक्तालयांतर्गत ५ ऑर्केस्ट्राबार वर कारवाई करून ५ गुन्हे व १ अदखलपात्र गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ऑर्केस्ट्राबार मध्ये डान्स किंवा परवाना अटी व शर्तींचे उल्लंघन केल्यास कायदेशिर कारवाई करण्यात येते.
ठाणे पोलीस आयुक्तालयांतर्गत व ठाणे ग्रामीण जिल्ह्यात जानेवारी ते नोव्हेंबर, २०२२ या कालावधीत इतर अवैध धंदे यामध्ये दारूबंदी-३९३, एनडीपीएस-२३, जुगार कायद्यांतर्गत-११, गुटखा संबंधी-१३, हुक्का पार्लर व कोट्पा अंतर्गत-१३ गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.
(५) प्रश्न उद्भवत नाही

---

**नांदुरमध्यमेश्वर (ता.निफाड, जि.नाशिक) येथील बंधाऱ्यास अतिरिक्त १० वक्राकार गेट बसविण्याबाबत**

**(११) ५६५४० (२७-०४-२०२३). श्री.दिलीपराव बनकर (निफाड) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नांदुरमध्यमेश्वर (ता.निफाड, जि.नाशिक) येथील नांदुरमध्यमेश्वर बंधाऱ्यांस १० वक्राकार नवीन गेट बसविण्याची मागणी तसेच त्यासाठी निधीची तरतूद करण्याची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी शासनाकडे दिनांक १३ जानेवारी, २०२० रोजी निवेदनाद्वारे केलेली आहे हे खरे आहे काय,
(२) असल्यास, वक्राकार गेटच्या कामासाठी शासनाने सन २०२०-२१ च्या अर्थसंकल्पीय वार्षिक आखणीमध्ये रु. ५७ कोटीची तरतूद केली असून सदरच्या प्रकल्पास शासनाने दिनांक १४ ऑक्टोबर, २०२१ रोजीच्या बैठकीमध्ये तत्वतः मान्यता दिलेली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर प्रकल्पाच्या कामास अद्यापही प्रशासकीय मान्यता देण्यात आलेली नाही हे खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन कामास प्रशासकीय मान्यता देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. देवेंद्र फडणवीस (११-०१-२०२४) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) अंशत: खरे आहे.
अतिरिक्त १० वक्राकार गेटच्या कामासाठी तत्कालीन मा. मंत्री (जलसंपदा) यांच्या अध्यक्षतेखालील दि. १४/१०/२०२१ च्या बैठकीत तत्वत: मान्यता देण्यात आली आहे. परंतू, सन २०२०-२१ च्या अर्थसंकल्पीय वार्षिक आखणी मध्ये आर्थिक तरतूद करण्यात आली नव्हती.
(३) व (४) सदर कामाचा समावेश चतुर्थ सुधारीत प्रशासकीय मान्यतेच्या प्रस्तावात करण्यात आला असून, प्रशासकीय मान्यतेबाबतचा प्रस्ताव क्षेत्रीय कार्यालयाने राज्यस्तरीय तांत्रिक सल्लागार समिती कार्यालय, नाशिक यांचेकडे सादर केला आहे. सदर प्रस्तावावर राज्य तांत्रिक सल्लागार समितीने शेरे उपस्थित केले असून, शेरे पुर्ततेची कार्यवाही क्षेत्रीय स्तरावर प्रगतीत आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मौजे शिळ (ता.राजापूर जि.रत्नागिरी) येथे शासनाच्या जलसंधारण विभागामार्फत लघु पाटबंधारे धरण प्रकल्प राबविण्याबाबत**

**(१२) ५७५४१ (२५-०४-२०२३). श्री.राजन साळवी (राजापूर) :** सन्माननीय **मृद व जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे शिळ (ता.राजापूर जि.रत्नागिरी) येथे शासनाच्या जलसंधारण विभागामार्फत ९५३७.५२ लक्ष रुपये खर्च करुन ३७५ हेक्टर सिंचन क्षमतेचा लघु पाटबंधारे धरण प्रकल्प राबविण्यात येणार असल्याचे माहे जानेवारी, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत सुमारे ५६.०५ हेक्टर जमिन संपादित करण्यात येणार असून प्रकल्पासाठी संपादित करण्यात येणाऱ्या जमिनीचा योग्य मोबदला देण्यात येईल अशी ग्वाही उपविभागीय अधिकारी यांनी शिळ येथे घेण्यात आलेल्या जनसुनावणीत ग्रामस्थांना दिली असल्याचे निदर्शनास आले आहे हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर धरण प्रकल्पात ज्या शेतकऱ्यांच्या जमीनी जाणार आहेत त्यांना देण्यात येणाऱ्या मोबदलाचे स्वरुप काय आहे ते किती दिवसात देण्यात येणार आहे,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. संजय राठोड (०१-१२-२०२३) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) होय, हे अंशत: खरे आहे.

(३) व (४) सदर धरण प्रकल्पात ज्या शेतक-यांच्या जमिनी जाणार आहेत त्यांना भूसंपादन व पुर्नवसन व पुनस्थाृ्पना करताना उचित भरपाई व योग्य मोबदला देण्यात येणार आहे. भूसंपादनाची रक्कम रुपये २५०.०० लक्ष उपविभागीय अधिकारी, राजापूर यांच्या कार्यालयात जमा करण्यात आली आहे.

तसेच उपविभागीय कार्यालय, राजापूर यांनी दि. १३.०७.२०२२ च्या पत्रान्वये अंदाजित अंतिम निवाडा रक्कम रु. ५००.०० लक्ष जमा करण्याबाबत कळविण्यात आले आहे. सदर रकमेची मागणी दि. २२.०७.२०२२ अन्वये महाराष्ट्र जलसंधारण महामंडळ, औरंगाबाद यांना सादर करण्यात आली आहे.

सदर भूसंपादन प्रकरणी आवश्यक ती कार्यवाही करुन शेतक-यांना लवकरात लवकर मोबदला देण्यात येईल.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**गडचिरोली येथे पोलीसांवर सतत नक्षलवादी हल्ले होत असल्याबाबत**

**(१३) ५७८६१ (०३-०५-२०२३). श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), ॲड.यशोमती ठाकूर (सोनावणे) (तिवसा) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गडचिरोली येथे पोलीसांवर सतत नक्षलवादी हल्ले होत आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पोलीसांवर हल्ले करणाऱ्या नक्षलवाद्यांकडून आधुनिक शस्त्र हस्तगत करण्यात आली आहेत, हे ही खरे आहे काय,

(३)असल्यास, या नक्षलवाद्यांविरोधात पोलिसांकडून होत असलेल्या कारवाईसंदर्भात पोलीस दल अधिक सक्षम करण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०३-०१-२०२४) :** (१) होय.

(२) होय.

(३) सदरच्या नक्षली कारवायांना आळा घालण्याच्या दृष्टीने गडचिरोली पोलीस दलाने राबविलेल्या मोहीमेत सन २०२१ मध्ये ४९ सशस्त्र नक्षल वादी चकमकी दरम्यान ठार झाले असुन १५ नक्षलवाद्यांना अटक करण्या आले आहे व ८

नक्षलवाद्यांनी पोलीसांपुढे आत्मसमर्पण केले आहे. तसेच सन २०२२ मध्ये ३ सशस्त्र नक्षलवादी चकमकी दरम्यान ठार झाले असुन ५१ नक्षलवाद्यांना अटक करण्यात आले आहे व ८ नक्षलवाद्यांनी पोलीसांपुढे आत्मसमर्पण केले आहे. सन २०२३ मध्ये ४ नक्षलवादी ठार झाले असुन ८ नक्षलवाद्यांना अटक करण्यात आली आहे. तसेच नक्षलवाद्यांच्या हिंसक कारवायांना आळा घालण्यासाठी गडचिरोली जिल्हा पोलीस दलातर्फे गुप्तवार्ता यांच्या आधारे लांब पल्ल्याचे अभियान (एलआरपी), आखुड पल्ल्याचे अभियान (एसआरपी), नाकाबंदी, अभियान तीव्र करण्यात आले आहे. शेजारील राज्यातील जिल्हा पोलीस यंत्रणेशी समन्वय ठेवुन आवश्यकतेनुसार आंतरराज्यीय संयुक्त नक्षलविरोधी अभियान राबविण्यात येत आहेत.

त्याच प्रमाणे गडचिरोली पोलीस दलातील जवानांना अद्यावत प्रशिक्षण देण्याकरीता किटाळी येथे कमांडो ट्रेनिंग सेंटर (सिटीसी) स्थापन करण्यात आले आहे. प्रशिक्षण केंद्रामध्ये शस्त्रे उपकरणे हाताळणे, नक्षलविरोधी अभियानाचे प्रशिक्षण, नक्षलवाद्यांच्या नबिन रणनितीला प्रतिउत्तर देण्याकरीता आवश्यक नविन रणनिती प्रशिक्षण, तांत्रिक प्रशिक्षण, आधुनिक हत्यार प्रशिक्षण, विविध कमांडो प्रशिक्षण दिले जाते. तसेच बाहेर राज्यांतील प्रशिक्षण केंद्रामध्ये विविध प्रकारच्या प्रशिक्षणासाठी पाठविले जाते.

नक्षल अभियाना करीता जिल्हा नियोजन समिती तसेच केंद्र शासनाच्या विविध योजनेतंर्गत वेळोवेळी निधी पुरविला जातो. त्यातुन आधुनिक साहित्य खरेदी केले जातात. जसेकी, मार्डन गॅझेट ड्रोन, वायरलेस साहित्य, जिपीएस, अॅन्टीड्रोन डिफेन्डर सिस्टम इत्यादी आधुनिक साहित्य खरेदी केले जाते. सद्या महाराष्ट्र शासनाकडुन ५० एमपीव्ही प्रस्तावित आहेत. अशा प्रकारे पोलीस दल अधिक सक्षम करण्यात येत आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**तिवसा, जळका हिरापूर (ता.भातकुली, जि.अमरावती) येथील ब्रिटीशकालीन तलावाच्या दुरुस्तीबाबत**

**(१४) ५७९२१ (१०-०५-२०२३). अॅड.यशोमती ठाकूर (सोनावणे) (तिवसा), श्री.बळवंत वानखडे (दर्यापूर), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.राजेश एकडे (मलकापूर), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.सुरेश वरपुडकर (पाथरी), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.जितेश अंतापूरकर (देगलूर) :** सन्माननीय **मृद व जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) तिवसा, जळका हिरापूर (ता.भातुकली, जि.अमरावती) येथील ब्रिटीशकालीन तलाव दिनांक १९ सप्टेंबर, २०२२ रोजी अतिवृष्टीमुळे पूर्णपणे भरल्याने तलावाच्या भिंतीवरील माती वाहून गेली असल्याचे निदर्शनास आले असून याबाबतचे स्थानिक लोकप्रतिनिधींनी माहे सप्टेंबर,२०२२ मध्ये वा त्यादरम्यान संबंधित विभागाकडे निवेदन दिले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने पाहणी केली आहे काय, पाहणीअंती काय आढळून आले, तदनुसार सदरहू तलावातील पाणी गावात व शेतात शिरु नये याकरिता तलावाच्या भिंतीच्या दुरुस्तीबाबत कोणती उपाययोजना वा कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. संजय राठोड (०९-०१-२०२४) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) होय,

अतिवृष्टीमुळे सुमारे १५० मी. भिंत दबल्याचे आढळून आले असून भिंतीला दोन ठिकाणी चरे गेलेले आहेत. दुरुस्तीचे अंदाजपत्रक तयार करण्यात आले असून निधी अप्राप्त असल्याने प्रक्रिया प्रलंबित आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**महाराष्ट्रात मोठा घातपात करण्याचा कट उघडकीस आल्याबाबत**

**(१५) ५८४३० (२६-०४-२०२३). श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.रविंद्र वायकर (जोगेश्वरी पूर्व), श्री.उदयसिंग राजपुत (कन्नड), श्री.सुनिल राऊत (विक्रोळी), श्री.चंद्रकांत (भाऊ) निंबाजी पाटील (मुक्ताईनगर), श्री.प्रकाश सुर्वे (मागाठाणे) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पंजाब ॲण्टी गॅंगस्टार स्क्वाईने महाराष्ट्र एटीस सोबत केलेल्या संयुक्त कारवाईत आंतरराष्ट्रीय दहशतवादी हरविंद सिंह उर्फ रिंदाच्या दहशतवादी मॉडयुलच्या आधारे महाराष्ट्रात मोठा घातपात करण्याचा कट दहशतवादी गटाकडून रचण्यात आला होता असे अटक करण्यात आलेल्या तीन संशयित दहशतवाद्यांच्या कबुली जबाबातून दिनांक १० जानेवारी,२०२३ रोजी वा त्या सुमारास उघडकीस आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासनाने उक्त प्रकरणी चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०४-०१-२०२४) :** (१) सदर प्रश्नासबंधी वस्तुस्थिती खालील प्रमाणे आहे.

दिनांक १८/०१/२०२३ रोजी पंजाब राज्याचे ॲन्टी गॅंगस्टर टास्क फोर्स मोहाली यांनी राहोन पो.स्टे. पंजाब गु. रजि.नं ३४/२२ कलम ३०२, १४८, १४९ भा.दं.वि.,सह कलम २५,५४,५९ आर्म ॲक्ट अन्वये दाखल गुन्हयामध्ये पंजाब येथील गॅंगस्टर सोनू खत्री याचे साथीदार (१) शिवम अवतारसिंग महालो, वय २२ वर्षे रा. ठि. नवाशहर, पेठ महंत, शहीद भगतसिंग नगर, पंजाब (२) गुरुमुख नरेशकुमार सिंग उर्फ गौरा, वय २३ वर्षे, रा. ठि. उधनेवाला ता. बलाजोर, शहिद भगतसिंग नगर, पंजाब (३) अमनदिप कुमार गुरमेलचंद उर्फ रॅंन्चो, वय २१ वर्षे, रा. ठि.खमा चौक ता. बंगाशहर जि.शहीद भगतसिंग नगर, पंजाब हे गॅंगस्टर आरोपी सोनू खत्री यांचे गॅंगचे सदस्य असून ते गॅंगस्टर /दहशतवादी हरविंदर सिंग उर्फ रिंदा याचे संपर्कातील असून, सदर पाहिजे आरोपी हे एन. आर. सी. कॉलनी, आंबिवली, कल्याण जिल्हा ठाणे या परिसरात वास्तव्यास असून, सदर आरोपींकडे विदेशी अग्नीशस्त्रे असण्याची शक्यता आहे अशी माहिती देवून दहशतवाद विरोधी पथक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांची मदत मागितली होती.

त्यानुसार दहशतवाद विरोधी पथकाचे अधिकारी व अंमलदार, पंजाब पोलीसचे अधिकारी व अंमलदार यांनी संयुक्त कारवाई करून नमूद आरोपींना जेरबंद केले. सदर तिन्ही पाहिजे आरोपींविरूध्द पंजाब राज्यात खून, खूनाचा प्रयत्न, गंभीर दुखापत, बेकायदेशीर शस्त्र बाळगणे स्फोटक पदार्थ बाळगणे असे गंभीर असून ते सराइत गुन्हेगार आहेत. ताब्यात घेतलेल्या आरोपींना पंजाब पोलीसांनी अटक केली आहे.

(२) व (३)

सदर आरोपींना पंजाब पोलिसांनी अटक केली असून तपास पंजाब पोलीस करीत आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**सिंधुदुर्ग जिल्ह्यात उन्हाळयात उद्भवणारी संभाव्य पाणी टंचाई टाळण्यासाठी बंधारे बांधण्याबाबत**

**(१६) ५९८२३ (२६-०४-२०२३). श्री.वैभव नाईक (कुडाळ) :** सन्माननीय **मृद व जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सिंधुदुर्ग जिल्ह्यात उन्हाळयात उद्भवणारी संभाव्य पाणी टंचाई टाळण्यासाठी जिल्हा परिषद प्रशासनाने सन २०२२-२०२३ यावर्षासाठी निश्चित केलेल्या ६२०० कच्चे व वनराई बंधारे बांधण्याचे उद्दीष्टांपैकी आतापर्यंत केवळ ९३२ बंधारे म्हणजे केवळ १५ टक्के उद्दीष्ट पूर्ण करण्यात आले असल्याची माहिती जिल्हा जलसंधारण विभागाकडून देण्यात आल्याचे निदर्शनास आले आहे हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर संथगतीने काम करण्याची कारणे काय असून सद्यःस्थिती काय आहे,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, त्यानुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत

**श्री. संजय राठोड (२४-०७-२०२३) :** (१) व (२) होय, हे खरे आहे.
(३) महाराष्ट्र जलसंधारण महामंडळांतर्गत नागपूर जिल्हयातील १८४ योजनांना प्रशासकीय मान्यता देण्यात आली होती. त्यापैकी १२७ कामांवरील स्थगिती उठविण्यात आली आहे.

जलसंधारण महामंडळामार्फत चंद्रपूर जिल्हयातील एकूण ५९ गेटेड साठवण बंधा-यांना प्रशासकीय मान्यता देण्यात आली होती, त्यापैकी ०५ योजनांची स्थगिती उठविण्यात आली आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मौजा बोरीबारा (सोनेगांव), (ता.आर्वी, जि.वर्धा) येथील आदिवासी कोलाम समाजाच्या कुटुंबांचे पुनर्वसन करण्याबाबत**

**(१७) ६०७६९ (११-०५-२०२३). श्री.दादाराव केचे (आर्वी) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मौजा बोरीबारा (सोनेगांव) (ता.आर्वी, जि.वर्धा) येथील कुऱ्हा तलावाच्या भिंतीला दिनांक १७ जुलै, २०२२ रोजी झालेल्या अतिवृष्टीमुळे तलावाच्या भिंतीला मोठ्या प्रमाणात भेगा पडल्यामुळे तेथे वास्तव्यास असलेल्या कुटुंबियांच्या जिवितास धोका निर्माण झाला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, मागील काळात देखील अतिवृष्टीमुळे तलावाच्या भिंतीला मोठ्या प्रमाणात भेगा पडल्यामुळे तेथील ३६ कुटुंबाचे स्थानांतरण करण्यात आले असून, त्यानुषंगाने जिल्हाधिकारी वर्धा, विभागीय आयुक्त, नागपूर विभाग यांनी दिनांक १० फेब्रुवारी, २०१४ व दिनांक १२ नोव्हेंबर, २०१८ रोजी महसुल व वन विभाग यांना तेथील कुटुंबाचे पुनर्वसन करण्याबाबत प्रस्ताव सादर केलेला आहे, हे खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रस्तावाच्या अनुषंगाने तेथील ३६ आदिवासी कोलाम समाजाच्या कुटुंबांना पुर बाधित म्हणून पुनर्वसन करण्याकरिता शासनाने कोणती कार्यवाही वा उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०८-१२-२०२३) :**१)होय, अंशत: खरे आहे.
अतिवृष्टीमुळे धरणाच्या माथा पातळीवर काही ठिकाणी भेगा पडल्या होत्या. सदर भेगा त्वरीत बुजविण्यात आल्या, तसेच सांडव्यावरुन जास्तीत जास्त पाणी वाहून जाण्याकरता व धरणातील पाणीसाठा कमी करण्याकरता सांडव्याच्या वरच्या व खालच्या बाजूस एक ते दीड मीटर खोलीपर्यंत नाली काढण्यात आली. तसेच धरण सुरक्षिततेच्या दृष्टीने सदर प्रकल्पावर धरण पातळीवरुन मुरुम टाकणे. धरणाच्या गाभा भागात gunny bags टाकून loading berms तयार करणे, toe drain स्वच्छ करणे यासारखे आकस्मिक कामे त्वरित करण्यात आली.
(२) होय, हे खरे आहे.
दिनांक १७ जुलै, २०२२ रोजी तेथील नागरीकांना सुरक्षिततेच्या कारणास्तव (एकुण ३९ कुटूंबातील अंदाजे १४ लोकांना) भोजनाची व राहण्याची तात्पुरती व्यवस्था करण्यात आली. तसेच तलाव फुटून जीवितहानी व वित्तहानी होवू नये याकरीता कायमस्वरुपी पुनर्वसन करण्यात यावे अशी लोकांनी मागणी केलेली आहे. दिनांक १०.०२.२०१४ रोजीच्या पत्रान्वये पुनर्वसन करण्याबाबत शासनास प्रस्ताव सादर करण्यात आलेला होता. परंतु उपविभागीय अभियंता, पाटबंधारे उपविभाग, आर्वी यांचे अहवालानुसार पुनर्वसनाची आवश्यकता वाटत नसल्याबाबत शासनास सादर केलेले आहे.
(४) सन २०२२ च्या पुराच्या अनुषंगाने, कुऱ्हा तलावाची सद्यस्थिती पाहण्याकरीता प्राचार्य विश्वेश्वरय्या राष्ट्रीय तंत्रज्ञान संस्था, नागपूर यांच्या टिमचे पाचारण करण्यात आले. त्यांनी दिनांक २१ नोव्हेंबर, २०२२ रोजी कुऱ्हा तलावाला प्रत्यक्ष भेट देऊन अहवाल दिनांक २० डिसेंबर, २०२२ रोजी सादर केलेला आहे. त्यानुषंगाने कार्यकारी अभियंता, निम्न वर्धा प्रकल्प व इतर संबंधीत यंत्रणाची जिल्हाधिकारी, वर्धा यांचे अध्यक्षतेखाली दिनांक ११ जानेवारी, २०२३ व दिनांक १६ फेब्रुवारी, २०२३ रोजी सभा घेण्यात आली. सर्व संबंधीतांकडून अहवाल प्राप्त होताच शासन निर्णय दिनांक १४ ऑक्टोंबर, २०२२ चे अनुषंगाने मौजा बोरीबारा (बाऱ्हा सोनेगांव) ता. आर्वी, जि. वर्धा या गावाचे पूरग्रस्त पुनर्वसन होणे

आवश्यक आहे किंवा कसे याबाबत निर्णय घेण्याचे नियोजित आहे.
(५) प्रश्नच उद्भवत नाही.

---

## कृष्णा मराठवाडा सिंचन प्रकल्पातंर्गत आंबेहोळ (जि.धाराशिव ) साठवण तलावापर्यंतच्या कामाचा प्राधान्यक्रमात समावेश करण्याबाबत

**(१८) ६०९६६ (२५-०४-२०२३). श्री.कैलास घाडगे पाटील (उस्मानाबाद) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कृष्णा मराठवाडा सिंचन प्रकल्पातंर्गत धाराशिव जिल्हयातील भूम, परंडा, वाशी ,कळंब ,तुळजापूर तालुक्यात कामे सुरु असल्याचे माहे जानेवारी, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, धाराशिव तालुक्यातील आंबेहोळ साठवण तलावापर्यतच्या कामांचा प्राधान्य क्रमात समावेश करण्यात आला नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, धाराशिव तालुक्यातील शेतक-यांमध्ये असंतोषाचे वातावरण असून याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींनी आंबेहोळ साठवण तलावापर्यतच्या कामाचा प्राधान्यक्रमात समावेश करण्याबाबत वारंवार मागणी केल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळले त्यानुंषगाने आंबेहोळ साठवण तलावापर्यतच्या कामांचा प्राधान्यक्रमात समावेश करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत

**श्री. देवेंद्र फडणवीस (११-०१-२०२४) :** (१) होय, हे खरे आहे.

कृष्णा मराठवाडा सिंचन प्रकल्पातंर्गत उपसा सिंचन योजना क्र.१ द्वारे कृष्णा खोरे अंतर्गतच्या भूभागातील भूम, परांडा, वाशी, कळंब, उस्मानाबाद या तालुक्यांमध्ये एकूण १४,९३६ हे. क्षेत्र ओलिताखाली आणण्याचे काम क्षेत्रीय स्तरावर प्रगतीपथावर आहे .

प्रकल्पाचे फेर नियोजन व प्राधान्यक्रमानुसार, शासन पत्र दि.१९/०३/२०१८ नुसार प्रथम प्राधान्यक्रमातील निश्चित केलेली कामे प्रगतीपथावर आहेत. त्यानुसार ७ अ.घ.फु. (TMC) (प्रथम टप्पा) कामासाठी निधी उपलब्धतेनूसार आवश्यक निधी उपलब्ध होत असून सदरहू कामे प्रगतीपथावर आहेत.
(२) अंशत: खरे आहे.

उपसा सिंचन योजना क्र.०१ अंतर्गत टप्पा ५ मधील दुधाळवाडी साठवण तलाव पर्यंतची कामे आणि धाराशिव तालुक्यातील आंबेहोळ साठवण तलावापर्यंतच्या कामांचा प्राधान्य क्रमात समावेश करण्यात आलेला नव्हता. तथापि, शासन पत्र दि.१५/०२/२०२१ अन्वये टप्पा क्र. १ ते ५ अंतर्गत दुधाळवाडी सा.त. पर्यंतची उर्वरीत कामे प्रथम प्राधान्यानुसार प्रगतीत असलेल्या कामासोबत हाती घेण्याबाबत मान्यता देण्यात आलेली आहे.
(३) होय, हे खरे आहे.

धाराशिव तालुक्यातील शेतकरी व स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी आंबेहोळ साठवण तलावापर्यंतच्या कामाचा प्राधान्यक्रमात समावेश करण्याबाबत मागणी केली आहे. यासंदर्भांत उपसा सिंचन योजना क्र.१ अंतर्गत टप्पा क्र.५ आंबेहोळ साठवण तलावापर्यंतचे बंद नलिकेची कामे कृष्णा मराठवाडा प्रकल्पाच्या द्वितीय सुधारित प्रशासकीय मान्यतेमध्ये अंतर्भूत असल्याने सदर कामांचे सर्वेक्षण करण्याबाबत क्षेत्रीय स्तरावर कार्यवाही करण्यात येत आहे.
(४) आंबेहोळ साठवण तलावापर्यंतच्या कामांचा प्राधान्यक्रमात समावेश करण्याबाबत उपसा सिंचन योजना क्र.१ अंतर्गत टप्पा क्र.५ मधील सविस्तर अंदाजपत्रके बनविण्याच्या दृष्टीने आवश्यक असलेल्या सर्वेक्षण, अन्वेषणाच्या कामांना क्षेत्रीय स्तरावर मान्यता देण्यात आलेली आहे. त्याअनुषंगाने सर्वेक्षणाचे कामे पूर्ण झाली आहेत. तसेच, सदर कामे पुढील तीन वर्षामध्ये पूर्ण करण्याचे क्षेत्रीय स्तरावर नियोजित आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**कोल्हापुरातील महापूराचे पाणी मारठवाड्याकडे वळविणेबाबत**

**(१९) ६१०९० (०८-०५-२०२३). श्रीमती जयश्री जाधव (कोल्हापूर उत्तर) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोल्हापूर व सांगली जिल्हयात सन २०२१ मध्ये आलेल्या महापूरामुळे शेतकऱ्यांचे व नागरिकांचे नुकसान झाल्यामुळे शासनाने कृष्णा नदीचे पाणी मराठवाडयातील जत, सांगली, सोलापूर, उस्मानाबाद, लातूर, बीड, जालना, औरंगाबाद येथील दुष्काळी भागात वळविण्याचे व भविष्यात येणाऱ्या महापुरावर कायमस्वरुपी तोडगा काढण्याचे जाहीरे केले असल्याचे माहे जुलै, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१२-०१-२०२४) :** (१) अंशत: खरे आहे.

कोल्हापूर आणि सांगली जिल्ह्यातील वारंवार येणाऱ्या पुरावर कायम स्वरुपी उपाय योनजेसाठी कृष्णा नदीतील अतिरिक्त पुराचे पाणी निरा नदीत वळवून दुष्काळी भागास देण्याबाबत योजनेची योग्ययोग्यता तसेच तांत्रिक, आर्थिक दृष्ट्या तपासणी करण्यात येत आहे.

(२) "कृष्णा नदीचे पुराचे पाणी बोगद्याद्वारे वळवून दुष्काळी भागात देण्याच्या सिंचन प्रकल्पाच्या कामाचे सर्वेक्षण, अन्वेषण करणे व प्रकल्प अहवाल तयार करणे" या कामाचा प्रशासकीय मान्यतेचा प्रस्ताव महामंडळाच्या दि. ३१/७/२०२३ रोजीच्या पत्रान्वये शासनास सादर करण्यात आला आहे. सदर प्रस्तावाच्या अनुषंगाने कार्यवाही प्रगतीत आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मौजे देवलीपाडा (ता.नवापूर, जि.नंदुरबार) गांवात विहिरीतील सुरुंग स्फोटात मजुरांचा झालेला मृत्यु**

**(२०) ६१९९७ (३०-०४-२०२३). श्री.शिरीषकुमार नाईक (नवापूर) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे देवलीपाडा (ता.नवापूर, जि.नंदुरबार) गांवात विहिरीतील सुरुंग स्फोटात डोक्याला दगड लागून मजुराचा मृत्यु झाला, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, विहीरीत सुरूंग लावून स्फोट करण्यासाठी ब्लास्टींगच्या ट्रक्टर मालकाने संबंधित विभागाकडुन व्यापारीक / कृषी परवाना घेतला होता काय,

(३) असल्यास, ज्या शेतकऱ्याच्या शेतात सुरूंग लावतांना मजूरांना व आजूबाजूच्या लोकांना पूर्व सुचना न देता स्फोट केला व एका मजूराच्या मृत्यूस कारणीभूत ठरलेल्या शेतमालक व ब्लास्टींगच्या ट्रक्टर मालकावर गुन्हा दाखल केला आहे काय,

(४) असल्यास, सुरूंगाच्या स्फोटात ज्या मजूराचे निधन झाले त्याच्या कायदेशीर वारसास नियमाप्रमाणे नुकसान भरपाई वा मदत देण्यात आली आहे काय, असल्यास किती मदत देण्यात आली ,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०३-११-२०२३) :** (१) हे खरे आहे.

(२) सदर गुन्ह्यातील मुख्य आरोपी जवळ असलेल्या स्फोट करण्याबाबतच्या परवान्याची वैधमा दिनांक २७.१२.२०१७ रोजी संपलेली आहे. सदर परवान्याची वैधता संपलेली असताना देखील आरोपी या प्रकारचे स्फोट करण्याचे काम करीत होता.

(३) व (४) मयत व्यक्तीच्या वारसास मदत देण्याबाबत तरतूद नसून प्रस्तुत प्रकरणी नंदुरबार जिल्हा घटकामध्ये विसरवाडी पोलीस ठाणे येथे गु.र.क्र. २६/२०२३ भा.दं.वि. कलम ३०४, ३०४ (अ), ३३८, ३४ सह बारी पदार्थ अधिनियम १९०८

चे कलम ३ अन्वये सबंधित शेतमालक व ब्लास्टींगच्या ट्रक्टर मालकाविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## मुंबईत अंधेरी परिसरात बनावट पासपोर्ट आणि व्हिसा बनविणा-या टोळीला केलेली अटक

**(२१) ६२८४७ (२८-०४-२०२३). श्री.अजय चौधरी (शिवडी), श्री.रमेश कोरगांवकर (भांडूप पश्चिम), श्री.भास्कर जाधव (गुहागर) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई पोलिसांच्या गुन्हे शाखेच्या पथकाने अंधेरी परिसरात छापा टाकून बनावट पासपोर्ट आणि व्हिसा बनविणा-या टोळीला दिनांक २५ जानेवारी, २०२३ रोजी वा त्यासुमारास अटक करण्यात आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदरची टोळी एजंटमार्फत एक ते पाच लाखात पासपोर्ट व व्हिसाची विक्री करीत असून त्यांनी दिलेल्या बनावट पासपोर्टवर अनेक जण परदेशात गेले आहेत, हे ही खरे आहे काय ,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,
(४) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार संबधितविरूध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०२-१२-२०२३) :** (१) होय. सदर प्रकरणी दाखल गुन्ह्यामध्ये ४ आरोपीतांना अटक करण्यात आले आहे.
(२) नाही. हे खरे नाही.
(३) व (४) संबंधित आरोपी हे बनावट पासपोर्ट बनवत नसुन पासपोर्टमधील कोऱ्या पृष्ठांवर बनावट ट्रॅव्हल हिस्ट्री दाखविण्याकरिता वेगवेगळया देशांचे बनावट इमिग्रेशन स्टॅम्प आणि प्रवाशांचे बनावट बँकींग प्रोफाईल दाखविण्याकरिता बँकांचे बनावट स्टॅम्प तयार करीत असल्याचे आढळून आले आहे. त्यामुळे सदर प्रकरणात छापा कारवाई करुन दि.२५.०१.२०२३ रोजी गु.प्र.शा.गु. र.क्र.०५/२०२३, कलम ४२०,४६५,४६७,४६८,४७१,४७३,३४ भादवि सह पोसपोर्ट अधिनियम, १९६७ चे कलम १२ (डी.एन. नगर पोलीस ठाणे गु.र क्र.८४/२०२३) नोंद करण्यात आला आहे. सदर गुन्ह्यात आतापर्यंत ४ आरोपीतांना अटक करण्यात आली असून त्यांच्याविरुद्ध मा. न्यायालयात दोषारोपपत्र दाखल करण्यात आले आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## आदमापूर येथील संत बाळूमामा मंदिर विश्वस्तांमध्ये झालेल्या हाणामारी बाबत

**(२२) ६४५७५ (२७-०९-२०२३). श्रीमती यामिनी यशवंत जाधव (भायखळा) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) आदमापूर येथील श्रीक्षेत्र बाळूमामा देवस्थान ट्रस्टच्या विश्वस्तांच्या दोन गटात राजारामपुरी पोलीस ठाण्याच्या हद्दीत दिनांक ३ एप्रिल, २०२३ रोजी वा त्यासुमारास हाणामारी झाली, हे खरे आहे काय ,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी गुन्हा नोंद करुन संबधितावर कोणती कारवाई केली तसेच उक्त हाणामारीची कारणे काय आहेत,
(३) तसेच मंदिर प्रशासनाचा कारभार सुरळीत सुरू राहण्यासाठी शासनाने कोणती उपायोजना केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१२-१२-२०२३) :** (१) होय.
(२) सदर घटनेबाबत राजारामपुरी पोलीस स्टेशन, कोल्हापूर येथे गु.र.नं.१३९/२०२३ भा.दं.वि.कलम ३२३,५०४,५०६,३४ प्रमाणे व गु.र.नं.१३८/२०२३ भा.दं.वि. कलम ३२३,३४ प्रमाणे दि.०३/०४/२०२३ रोजी अदखलपात्र गुन्हे दाखल करण्यात आली आहेत. दोन्ही गुन्ह्यातील आरोपींना सी.आर.पी.सी. १४९ प्रमाणे नोटीसव्दारे समज देण्यात आली आहे.
देवस्थान ट्रस्टच्या कार्याध्यक्ष पदावर नियुक्ती संदर्भात वाद झाल्याने सदर हाणामारी झाल्याचे पोलीसांनी अहवालाद्वारे सादर केले आहे.
(३) मंदिर प्रशासनाचा कारभार सुरळित सुरु राहण्यासाठी सहाय्यक धर्मादाय आयुक्त, यांचेकडून वादग्रस्त विश्वस्त मंडळ बरखास्त करुन मूळ अर्जाचा निकाल लागेपर्यंत दिनांक २४/०४/२०२३ रोजी प्रशासकाची नियुक्ती करण्यात आली आहे. सध्या मंदिराचा कारभार प्रशासनाच्या देखरेखी खाली सुरु आहे.
(४) विलंब झालेला नाही.

---

## मंत्रालयासमोर विष प्राशान करून महिलांनी केलेली आत्महतेबाबत

**(२३) ६४५७७ (२७-०९-२०२३). श्रीमती यामिनी यशवंत जाधव (भायखळा), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), डॉ.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.अनिल देशमुख (काटोल), ॲड.अशोक पवार (शिरुर), श्री.दिलीपराव बनकर (निफाड), श्री.रोहित पवार (कर्जत जामखेड), श्री.सुनिल शेळके (मावळ), श्री.निलेश लंके (पारनेर), श्री.अबू आजमी (मानखूर्द शिवाजीनगर), श्री.विनोद निकोले (डहाणू), श्री.दिपक चव्हाण (फलटण), श्री.सुनिल राऊत (विक्रोळी), श्री.चेतन तुपे (हडपसर), श्री.मनोहर चंद्रिकापूरे (अर्जुनी-मोरगांव), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), डॉ.राजेंद्र शिंगणे (सिंदखेड राजा), श्री.संग्राम जगताप (अहमदनगर शहर) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) धुळे येथे राहणाऱ्या शीतल गादेकर तसेच नवी मुंबई येथे राहणाऱ्या संगिता डवरे या दोन्ही महिलांनी मंत्रालयासमोर विषारी द्रव्ये प्राशन करुन आत्महत्येचा प्रयन केला असल्याचे दिनांक २७ मार्च, २०२३ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे,
(२) असल्यास, या दुर्घटनेत शीतल गादेकर यांचा दि. २८ मार्च, २०२३ रोजी तर संगिता डवरे यांचा दि.४ एप्रिल २०२३ रोजी मृत्यू झाल्याची बाब निदर्शनास आली आहे, हेही खरे आहे काय,
(३) असल्यास, यापैकी श्रीमती गादेकर या धुळे येथील औद्योगिक वसाहतीमधील प्लॉट अधिकाऱ्यांनी बनावट कागदपत्र बनवून दुसऱ्या इसमाला विकला तसेच श्रीमती ढवरे या नवी मुंबई पोलिसात कार्यरत असलेल्या व अपघातात जखमी झालेल्या पतीवर रुग्णालयातील डॉक्टरांनी वेळीच उपचार न केल्याने त्यांचेवर कारवाई करावी अशी तक्रार घेऊन या महिला आल्या होत्या, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहेत काय त्याअनुषंगाने ज्या कारणामुळे त्यांनी आत्महतेचा निणर्य घेतला त्या कामांचे निराकारण करण्यात आले आहे काय,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२७-१२-२०२३) :** (१) होय.
(२) होय.
(३) होय.
(४) श्रीमती शितल गादेकर यांनी दिलेल्या तक्रारीच्या अनुषंगाने आरोपिविरुध्द मोहाडीनगर पोलीस ठाणे, जिल्हा धुळे येथे गु.र.क्र.५८/२०२३ कलम ४२०, ४६७, ४६८, ४७१, ३४ भा.दं.वि. अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला असून पुढील तपास स्थानिक गुन्हे शाखा, धुळे हे करीत आहेत.
श्रीमती संगिता ढवरे यांनी केलेल्या तक्रारीच्या अनुषंगाने दोन आरोपिंविरुध्द नवी मुंबई येथील सी.बी.डी. पोलीस

ठाणे येथे गु.र.क्र.६५/२०२३, कलम ३३६, ३३७ भा.दं.वि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला असून दोन आरोपिंविरुध्द दोषारोपपत्र दाखल करण्यात आले आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**धुळे जिल्ह्यात गेल्या तीन महिन्यात २८३ जणांचा विविध कारणांनी आकस्मिक मृत्यू झाल्याबाबत**

**(२४) ६४६३० (२७-०९-२०२३). श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) धुळे जिल्ह्यात गेल्या तीन महिन्यात २८३ जणांचा विविध कारणांनी आकस्मिक मृत्यू झाला असून, एकूण २४४ जण बेपत्ता झाले असल्याचे माहे मे २०२३ वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय ,
(२) असल्यास, बेपत्ता झालेल्यांमध्ये सर्वाधिक ९८ मुली व महिलांचा समावेश आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१२-१२-२०२३) :** (१) व (२)
धुळे जिल्ह्यात माहे मार्च, २०२३ ते माहे मे, २०२३ या कालावधीमध्ये एकूण ३०५ नागरिकांचा विविध कारणांनी मृत्यू झाला असून त्याबाबत आकस्मिक मृत्यू प्रकरणे दाखल करण्यात आली असून एकुण ३०८ जण बेपत्ता झाल्याची प्रकरणे दाखल आहेत. बेपत्ता झालेल्यांमध्ये मुली व महिलांची संख्या १९० इतकी आहे.
(३) सदर आकस्मात मृत्यू प्रकरणी एकुण ३०५ प्रकरणांपैकी १०२ प्रकरणांची चौकशी पुर्ण करुन निर्गती करण्यात आली आहे. इतर प्रकरणांबाबत चौकशी सुरु आहे.
एकुण १९० बेपत्ता झालेल्यांपैकी १२४ मुली व महिलांचा शोध घेण्यात आला असून उर्वरित बेपत्ता मुली व महिलांचा शोध पोलीसांमार्फत सुरु आहे.
(४) विलंब झालेला नाही.

---

**भुसावळ तालुक्यातील पोलीस उप अधीक्षकच्या पथगाने गावठी पिस्टल सह जिवंत काडतूस व दोन चॉपर बाळगणाऱ्या व विक्री करणाऱ्या इसमाला ताब्यात घेतल्या बाबत**

**(२५) ६४६४० (२७-०९-२०२३). श्री.संजय सावकारे (भुसावळ) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) भुसावळ तालुक्यातील साकेगावातील दोघासह ,भुसावळतील एका इसमास,दोन गावठी पिस्टल सह जिवंत कडातूस व दोन चॉपर बाळगणाऱ्या व विक्री करणाऱ्या इसमाला दि. ३ मे २०२३ रोजी वा त्यासुमारास पोलीस उप अधीक्षकच्या पथकाने ताब्यात घेतले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त घटनेची शासनाने चौकशी केली आहे काय, सदर हत्यारे कोणत्या उद्देशाने जवळ बाळगली होती, तसेच चौकशीत काय आढळून आले, त्याअनुषंगाने संबधित दोषीवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०२-१२-२०२३) :** (१) हे खरे आहे.
(२) सदर घटनेची चौकशी करण्यात आली असून साकेगाव बीट हद्दीत साकेगाव रोडवरील मराठी शाळेच्या मैदानावर सदर गुन्ह्यातील ३ आरापी विना परवाना अनधिकृतपणे अग्नीशस्त्र व चॉपर स्वत:च्या ताब्यात विक्री करण्याच्या उद्देशाने बाळगताना मिळून आले.
प्रस्तुत प्रकरणी भुसावळ तालुका पोलीस ठाणे येथे सी.सी.टी.एन.एस.गु.र.क्र. ८४/२०२३ शस्त्र (सुधारणा) अधिनियम, २०१९ च्या कलम ३/२५, ५/२५, २५ (६)(७)(८) सह भा.दं.वि. कलम ३४ महाराष्ट्र पोलीस कायदा कलम ३७

(१)(१३५) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

सदर गुन्ह्याचा सखोल तपास करुन आरोपींविरुध्द मा. न्यायालयात दोषारोपपत्र दाखल करण्यात आले आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## गुजरात राज्यातील सुरत येथील शुकुल ग्रुपने धुळे, नंदुरबार, जळगांव जिल्ह्यासह महाराष्ट्रातील हजारो लोकांची फसवणूक केल्याबाबत

**(२६) ६४९५७ (२७-०९-२०२३). श्री.जयंत पाटील (इस्लामपूर) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गुजरात राज्यातील सुरत येथील शुकुल ग्रुप या कंपनीने धुळे, नंदूरबार, जळगांव जिल्ह्यासह राज्यातील हजारो लोकांना जास्त व्याज देण्याचे आमिष दाखवून त्यांच्येकडून करोडो रुपये गोळा केलेले असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, गुंतवणूकदारांना त्यांचा परतावा किंवा त्यांचे पैसे परत देण्यात आले नसल्यामुळे धुळे जिल्ह्यातील नागरिकांनी दिनांक १३ सप्टेंबर, २०२२ रोजी वा त्यासुमारास धुळे जिल्ह्यातील दोंडाई पोलिस ठाण्यांत मंगेश नारायण पाटील व आकाश मंगेश पाटील, यांचेविरुध्द गुन्हा दाखल केला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार संबंधितांविरुध्द कोणती कारवाई केली तसेच नागरिकांचे पैसे त्यांना परत मिळण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१२-१२-२०२३) :** (१) होय, धुळे जिल्ह्यात अशी घटना घडली असल्याचे निदर्शनास आले आहे.

(२) होय,

(३) व (४) सदर प्रकरणी फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीनुसार दोंडाईचा पोलीस स्टेशन, धुळे येथे दि.१३.०९.२०२२ रोजी गु.र.नं.३०१/२०२२, भा.दं.वि. कलम ४०९, ४०६, ४२०, १२० (ब), ३४ सह महाराष्ट्र ठेवीदारांचे (वित्तीय संस्थांमधील) हित संबंधाचे संरक्षण अधिनियम १९९९ चे कलम ३ व बक्षीस चिठ्ठी व धन परिसंचरण योजना (निर्बंध) अधिनियम १९७८ चे कलम ४, ५, ६ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

सदर गुन्हयाच्या तपासात पुर्वनियोजित कट रचुन गुंतवणुकदारांना ८ ते ९ टक्क्याचे प्रतिमाह व्याजाचे अमिष दाखवून विविध कंपन्यां नोंदणी करुन त्यामध्ये पैसा वळविला असल्याचे आढळुन आले आहे. आतापर्यंतच्या पोलीस तपासात पिडीत गुंतवणुकदारांचे एकुण रु.४,७४,९०,०००/- ची फसवणुक झाल्याचे निष्पन्न झाले आहे. सदर गुन्ह्यात ९ आरोपींना अटक करण्यात आले असून त्यांच्याविरुध्द मा. न्यायालयात आरोपपत्र दाखल करण्यात आले आहे.

संबंधित कंपनीचे बँक खाते गोठविण्यात आले असून गुंतवणुकदारांनी गुंतवलेली रु.९,९३,००,०००/- इतकी रक्कम भारतीय प्रतिभूती आणि नियामक मंडळाने (सेबी) गोठवून जप्त केली असुन सदर रक्कम गुंतवणुकदारांना टप्याटप्याने वितरीत करणार आहेत. तसेच आरोपींच्या नावाने असलेली चल/अचल संपत्तीची माहिती मिळणेकामी नोंदणी महानिरीक्षक, गांधीनगर (गुजरात) यांना पोलीस विभागाकडून पत्रव्यवहार करण्यात आला आहे.

(५) विलंब झालेला नाही.

---

## कल्हे (ता.पनवेल) येथे विक्रीस बंद असलेले बनावट विदेशी मद्याचा साठा जप्त केल्याबाबत

**(२७) ६४९७३ (२४-०८-२०२३). श्री.लहू कानडे (श्रीरामपूर) :** सन्माननीय **राज्य उत्पादन शुल्क मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई गोवा राष्ट्रीय महामार्गाजवळ पनवेल तालुक्यातील कल्हेगावत महाराष्ट्रात विक्रीस बंदी असलेल्या बनावट विदेशी मद्याचा साठा जप्त केल्याचे दिनांक ५ जून २०२३ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे,हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणात दोघांना अटक करण्यात आली असून त्यांच्याकडून सुमारे १ कोटी १८ लाख रुपयाचा मद्यासह मुद्देमाल राज्य उत्पादन शुल्क विभागाच्या पथकाकडून जप्त करण्यात आलेला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्या, उक्त प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय,चौकशीत काय आढळून आले,त्यानुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. शंभूराज देसाई (२३-११-२०२३) :**(१) होय, सदरची कारवाई दि. २ जून, २०२३ रोजी करण्यात आली आहे.

(२) सदर कारवाईमध्ये सात आरोपींना अटक करण्यात आली असून एकूण किंमत रु. १,१८,९४,३६०/- एवढ्या किंमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आलेला आहे.

(३) सदर कारवाईच्या अनुषंगाने दि. ०२.०६.२०२३ रोजी महाराष्ट्र दारुबंदी कायदा, १९४९ अंतर्गत गु.र.क्र. ३३०/२०२३ नोंद केला असून सात आरोपींना अटक करण्यात आली आहे. सदरच्या तपासामध्ये ट्रकमध्ये सापडलेल्या टॅक्स इनवाईस/कागदपत्रे बनावट असल्याचे निदर्शनास आले असून सदर वाहन सिंधुदुर्ग जिल्ह्यातील इन्सुली तपासणी नाका येथून दि. ०१.०६.२०२३ रोजी राज्यात आल्याचे सी.सी.टी.व्ही. फुटेजवरुन दिसून येते. तसेच, जप्त केलेल्या मद्याच्या ब्रँडला गोवा अबकारी विभागाने मान्यता दिलेली नसल्याचे तपासात दिसून आले असून प्रकरणाचा पुढील तपास सुरु आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## रबाले नवी मुंबई येथे डान्स बार वर छापा टाकल्याबाबत

**(२८) ६४९७४ (२८-०८-२०२३). श्री.लहू कानडे (श्रीरामपूर) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रबाळे एमआयडीसी नवी मुंबई येथील मायरा ऑर्केस्ट्रा बारच्या नावाखाली चालणाऱ्या डान्सबारवर टाकलेल्या छाप्यात सुमारे ३७ बारबाला व १७ वेटर व मोठ्या संख्येने ग्राहक आढळून आल्याचे दिनांक ४ जून २०२३ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यापूर्वीही पनवेल व कोपरखैरणे येथील डान्सबार वर ही कार्यवाही करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, राज्यात डान्सबार वर बंदी असताना इतक्या मोठ्या प्रमाणावर डान्सबार सुरू असण्याची कारणे काय आहेत,

(४) असल्यास, शासनाने चौकशी करुन डान्सबार बंद करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०४-०१-२०२४) :** (१) पोलीस आयुक्तालय, नवी मुंबई अंतर्गत रबाले एमआयडीसी येथे मायरा ऑर्केस्ट्रा बार आहे. सदर ऑर्केस्ट्रा बार मधील महिला वेटर बिभत्स कपडे घालून अश्लील वर्तन करत असल्याचे आढळून आल्याने, तसेच सदर आस्थापना विहित वेळेपेक्षा जास्त वेळ चालू ठेवल्याने रबाले एमआयडीसी पोलीस स्टेशन येथे गु.र.क्र. २१२/२०२३, भा.दं.वि. कलम ३४, २९४, महिलांच्या प्रतिष्ठेचे संरक्षण अधिनियम, २०१६ कलम ३, ८ (१) (२) (४) सह मु.पो.का. कलम ३३ डब्लू, १३१ अन्वये दिनांक ०३.०६.२०२३ रोजी गुन्हा दाखल करण्यात आला

आहे. सदर गुन्ह्याच्या अनुषंगाने प्रथम वर्ग दंडाधिकारी, वाशी, नवी मुंबई यांचे न्यायालयात दिनांक ०४.०८.२०२३ रोजी दोषारोपपत्र दाखल करण्यात आले आहे.
(२) हे खरे नाही.
(३) व (४) नवी मुंबई पोलीस आयुक्तालयाच्या कार्यकक्षेत डान्सबार ला परवाने देण्यात आलेले नाहीत.

नवी मुंबई पोलीस आयुक्तालयाच्या कार्यकक्षेतील सर्व्हिस बार व ऑर्केस्ट्रा बार आस्थापनांनी सार्वजनिक मनोरंजनाच्या (चित्रपटा व्यतिरिक्त) जागांना परवाना देणे व त्यांचे नियंत्रण करण्याबाबतच्या नियमांचे उल्लंघन व परवान्यातील अटी व शर्तींचा भंग केल्याने सन २०२३ मध्ये ९ आस्थापनांवर निलंबनाची कारवाई करण्यात आली आहे.

तसेच, महाराष्ट्र हॉटेल, उपहारगृहे आणि मद्यपान कक्ष (बार रूम) यामधील अश्लील नृत्यांवर प्रतिबंध घालण्याबाबत व (त्यामध्ये काम करणाऱ्या) महिलांच्या प्रतिष्ठेचे संरक्षण करण्याबाबत अधिनियम, २०१६ मधील तरतूदींचे उल्लंघन केल्यास कायदेशीर कारवाई करण्यात येते.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## भुसावळ (जि.जळगांव) तालुक्यातील साकरी -फेकरी रेल्वे उड्डाणपुला जवळील रस्त्यावर दोघा तरुणांवर गावठी कट्यातून गोळीबार झाल्याबाबत

**(२९) ६५१३३ (२७-०९-२०२३). श्री.संजय सावकारे (भुसावळ) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) भुसावळ (जि.जळगांव) तालुक्यातील साकरी -फेकरी रेल्वे उड्डाणपुला जवळील रस्त्यावर भुसावळतील दोघा तरुणांवर गावठी कट्यातून गोळीबार झाल्याची घटना दि १४ एप्रिल२०२३ रोजी वा त्यादरम्यान घडली असल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय
(२) असल्यास, मुबई येथे उपचारा दरम्यान एकाचा मृत्यू झाला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास उक्त प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय,
(४) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने दोषी आढळणाऱ्या व्यक्तींवर शासनाने काय कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१२-१२-२०२३) :** (१), (२) व (३) होय.
(४) प्रश्नाधिन घटनेच्या अनुषंगाने भुसावळ पोलीस स्टेशन, जळगाव येथे गु.र.नं.५६/२०२३ भा.दं.वि. कलम ३०२,३०७,३२६,३४१,३४ सह आर्म ॲक्ट कलम ३/२५,२७ प्रमाणे दि.१५/०४/२०२३ रोजी गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदर गुन्ह्याच्या तपासादरम्यान एकाचा मृत्यू झाल्याने ३०२ कलम वाढविण्यात आला आहे. सदर गुन्ह्यातील आरोपींना अटक करण्यात आले असून दि.१३/०७/२०२३ रोजी मा.न्यायालयात दोषारोपपत्र दाखल करण्यात आले असून सदर प्रकरण न्यायप्रविष्ठ आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## कोकणात चिपळूण येथील वशिष्टी नदीतुन समुद्रात वाहुन जाणारे पाणी सिंचनासाठी वापरण्याबाबत

**(३०) ६५१९६ (०३-०९-२०२३). डॉ.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.रोहित पवार (कर्जत जामखेड) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कोकणात चिपळूण येथील वशिष्टी नदीतुन समुद्रात वाहुन जाणारे साठ टीएमसी पाणी सिंचनासाठी वापरण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर प्रस्तावाचे थोडक्यात स्वरुप काय आहे,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन वशिष्टी नदीतून वाहून जाणारे साठ टीएमसी पाणी सिंचनासाठी वापरण्यासंदर्भात कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१२-०१-२०२४) :** (१) होय हे अंशत: खरे आहे.
कोयना प्रकल्पातून वीजनिर्मिती नंतर वाशिष्टी नदीपात्रात सोडण्यात येणारे ६७.५० टीएमसी पाणी कोकणात सिंचन व बिगरसिंचनासाठी वापरणे विचाराधीन आहे.
(२) कोयना प्रकल्पातून वीजनिर्मितीनंतर वाशिष्ठी नदीत सोडण्यात येणा-या ६७.५० टीएमसी पाण्याचा/अवजलाचा वापर कोळकेवाडी धरणातून १४० मी. तलांकावरुन ग्रॅव्हीटी ग्रीडद्वारे कोकणात सिंचन व बिगर सिंचनासाठी वापरणे प्रस्तावित आहे. सदर पाण्यापैकी ५०.०० टीएमसी पाणी उत्तरेकडे कुंडलिका, पाताळगंगा, उल्हास खो-यात तर उर्वरीत १७.५० टीएमसी पाणी दक्षिणेकडे शास्त्री, मुचकुंदी, कोदवली खो-यात सिंचन/ बिगर सिंचन वापरासाठी वापर करणे विचाराधीन आहे.
(३) शासन पत्र दि.१२/१०/२०१८ अन्वये कोयना अवजलाच्या वापरा करीता पूर्व संभाव्यता अहवाल / सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करण्यासाठी केंद्र शासन अंगीकृत WAPCOS Pvt. Ltd नवी दिल्ली यांना सल्लागार म्हणुन नेमण्यास मान्यता दिली आहे. त्या अनुषंगाने WAPCOS यांचेकडून प्राप्त कोयना अवजल वापराकरीता सर्वेक्षणासह प्राथमिक अहवाल तयार करण्यासाठीचे अंदाजपत्रकाची छाननी राज्य तांत्रिक संल्लागार समिती कडे प्रगतीपथावर आहे. रा.ता.स.स.,नाशिक यांचे कडून छाननी पूर्ण झालेनंतर क्षेत्रीय स्तरावरुन प्रशासकीय मान्यतेसाठीचे अंदाजपत्रक शासनास प्राप्त झाल्यानंतर प्रशासकीय मान्यतेची कार्यवाही करणे शक्य आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**देवघर मध्यम पाटबंधारे प्रकल्पाच्या डाव्यातीर कालव्यासाठी घोणसरी व फोंडातीर गावातील शेतकऱ्यांच्या घेतलेल्या जमिनीबाबत**

**(३१) ६५३१२ (३१-०८-२०२३). श्री.वैभव नाईक (कुडाळ) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) देवघर मध्यम पाटबंधारे प्रकल्पाच्या डाव्यातीर कालव्यासाठी घोणसरी व फोंडातीर गावातील शेतकऱ्यांच्या जमिनी माहे जून, २०१५ मध्ये संपादित करण्यात येऊनही अद्याप प्रकल्पाच्या कामास सुरुवात झालेली नाही, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, गेली आठ वर्षे सदर प्रकल्पाचे काम प्रलंबित असून शासन नियमांनुसार उक्त प्रकल्पासाठी संपादित करण्यात आलेल्या जमिनीचा निवाडा मुदतबाह्य झाला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त गावातील शेतकऱ्यांनी नव्याने निवाडा करुन वाढीव मोबदला देण्याची मागणी जिल्हाधिकारी, सिंधुदुर्ग यांच्याकडे माहे जून, २०२२ मध्ये वा त्यादरम्याने निवेदनाव्दारे केली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार ग्रामस्थांच्या मागणीच्या अनुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१०-०१-२०२४) :**(१) हे खरे नाही.
जमीनीची खरेदी प्रक्रीया पूर्ण झाल्यानंतर डावा तीर कालव्याच्या ७.५२ किमी. च्या कालव्यापैकी ५.०० किमी पर्यंत मातीकाम व बांधकाम पूर्ण झालेली आहेत. उर्वरित किमी ५ ते ७.५२ किमी मधील फोंडा गावातील जमिनीचे भूसंपादन थेट खरेदीने संपादित करणे चालु असुन खरेदी झालेल्या जमीनीतील कालव्याची कामे प्रगतीपथावर आहेत. तसेच प्रकल्पाच्या मुख्य धरणाची कामे १०० % पुर्ण झालेली आहेत.
(२) हे खरे नाही.
प्रकल्पास सुप्रमा प्राप्त नसल्यामूळे व अपुऱ्या निधी उपलब्धतेमूळे गेली आठ वर्षे प्रकल्पाचे काम संथ गतीने सुरु

होते.आता प्रकल्पाच्या चतुर्थ सुप्रमा प्रस्तावास शासन निर्णय क्रमांक सूप्रमा-२०१९/३१२/ (प्र.क्र. ९६/१९) मध्यम प्रकल्प / मंत्रालय अन्वये दि. ०८/१२/२०२१ रोजी मंजुरी प्रदान केली आहे. त्यानुसार प्रकल्पाची कामे प्रगतीपथावर आहेत.

डावा तीर कालवा उर्वरित किमी ५ ते ७.५२ किमी मधील कामासाठी आवश्यक प्रस्ताव क्र.६/१५ व ७/१५ चे भूसंपादन मोबदला विवरणपत्र उपविभागीय अधिकारी यांचे पत्र जा.क्र.२९३३ दिनांक १७/०८/२०२० अन्वये प्राप्त झाले असून त्यानुसार जमिनीचे भूसंपादन थेट खरेदीने संपादित करणे प्रगतीपथावरआहे. मात्र खातेदारांचे आपापसातील खाते फोड झालेली नसणे, खातेदार बाहेरगावी असणे, तर काही खातेदारास दर मान्य नसणे इत्यादी कारणामूळे खरेदी प्रक्रिया आवश्यक त्या गतीने होत नाही.

(३) हो, हे खरे आहे.

पालकमंत्री, सिंधुदुर्ग यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हाधिकारी कार्यालय येथे दिनांक ०८/११/२०२१ रोजी आयोजित केलेल्या बैठकीत भूसंपादन प्रस्ताव क्र. फोंडा ०६/२०१५ व ०७/२०१५ मध्ये मोबदला दर वाढवून देणेसाठी शासनाकडे प्रस्ताव सादर करणेच्या सूचना दिलेल्या आहेत.

(४) मा.जिल्हाधिकारी सिंधुदुर्ग यांचे मा.सह सचिव, महसूल व वन विभाग, मुंबई, यांना उद्देशून पत्र दिनांक-१३/१२/२०२१(०७/१२/२०२१) अन्वये वाढीव मोबदला वाढवून मिळणेबाबत मागणी केली आहे.

जिल्हाधिकारी, सिंधुदूर्ग यांचे दि.०७.१२.२०२१ रोजीच्या प्रस्तावाच्या अनुषंगाने शासन पत्र दि.३१.०७.२०२३ अन्वये, भुसंपादनाकरीता संबंधित जिल्हाधिकारी यांना समुचित शासन म्हणून शासनाचे अधिकार प्रदान केलेले आहेत. त्यामुळे, भूसंपादन अधिनियम २०१३, कलम २६ ते ३० मधील तरतूद व महाराष्ट्र सुधारणा नियम, २०१४ मधील नियम १७(६) नुसार “जमिनीचे मुल्यांकन व भूसंपादन मोबदला निश्चित करण्याची कार्यवाही संबंधित जिल्हाधिकारी / भूसंपादन अधिकारी यांनी करणे आवश्यक आहे.विवक्षित भूसंपादन प्रकरणी संपादित होणा-या जमिनीचे मूल्यांकन व भूसंपादन मोबदला निश्चित करणे, याबाबतची कार्यवाही ही शासन स्तरावर करण्यात येत नाही” असे महसूल व वन विभागातर्फे संबंधीत जिल्हाधिकारी यांना कळविण्यात आलेले आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**देगलुर (जि.नांदेड) येथे एटीएम कार्डची अदलाबदल करुन एटीएम मशीन मध्युन रक्कम काढल्याबाबत**

**(३२) ६५५४७ (२७-०९-२०२३). श्री.मोहनराव हंबर्डे (नांदेड दक्षिण), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.अशोकराव चव्हाण (भोकर), श्री.जितेश अंतापूरकर (देगलूर), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्रीमती सुलभा खोडके (अमरावती), श्रीमती जयश्री जाधव (कोल्हापूर उत्तर), श्री.संजय जगताप (पुरंदर), श्री.ऋतुराज पाटील (कोल्हापूर दक्षिण) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) देगलुर (जि. नांदेड) शहरातील मोढा कॉर्नर येथे असलेल्या एसबीआय बॅकेच्या एटीएम मशीनवर एटीएम मशीन कार्डची अदलाबदल करुन एका चोरटयाने दिनांक ९ मे २०२३ रोजी वा त्यासुमारास ७१ हजार १५० रुपयांची चोरी केली असल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यासंदर्भात येथील देगलुर ठाण्यात गुन्हा नोंद झाला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी करुन या गुन्हयातील दोषींवर कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१२-१२-२०२३) :** (१) व (२) होय.

(३) सदर घटनेच्या अनुषंगाने देगलुर पोलीस स्टेशन येथे गु.र.न. २३९/२०२३ भा.दं.वि.कलम ४२० अन्वये दिनांक ०९.०५.२०२३ रोजी अज्ञात व्यक्ती विरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला असून गुन्ह्याचा पुढील तपास सुरु आहे.

(४) विलंब झालेला नाही.

---

## मुंबईतील खार (पश्चिम) लिंक रोड येथे असलेला रेडीओ बार पहाटे पर्यत सुरु असल्याबाबत

**(३३) ६५८३२ (२७-०९-२०२३). श्री.सुनिल राऊत (विक्रोळी), श्री.चेतन तुपे (हडपसर) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील खार (पश्चिम) लिंक रोड येथे असलेल्या रेडीओ बारमध्ये पोलिसांनी टाकलेल्या छाप्यात पहाटे साडेतीन वाजेपर्यंत ग्राहक दारु पित असल्याचे व मोठ्या आवाजात डी.जे लावून त्यांवर अश्लिल नृत्य करीत असल्याचे दिनांक १ मे, २०२३ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकार बंद करण्याबाबत एका समाज सेवी संस्थेच्या पदाधिकाऱ्यांनी बार मालकाला विनंती केली असता, त्या बारमध्ये मद्य प्राशन करीत असलेल्या एका राजकीय पक्षाच्या सदस्यांनी त्यांना मारहण केली, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, त्या समाजसेवकाने पोलिसांना पाचारण केले असता पोलिसांनी बार बंद करण्याबाबत सांगितले असता एका राजकीय पक्षाच्या पदाधिकाऱ्याने पोलिसांना केलेली शिवीगाळ करुन मारहाण केली, हेही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, त्याअनुषंगाने संबंधितांविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०१-१२-२०२३) :** (१) हे खरे नाही,

सदर घटना दिनांक ०१.०५.२०२३ रोजीची नसून, दिनांक २९/३०.०४.२०२३ रोजीची आहे. मुंबईतील खार (पश्चिम) लिंक रोड येथील रेडीओ बार विहित वेळेपेक्षा जास्त वेळ चालू होता. सदरहू आस्थापनेत इतर कोणतेही प्रकार घडलेले नाहीत. आस्थापनेचे सहायक व्यवस्थापक यांचेवर खार पोलीस ठाणे, मुंबई येथे स्था.ख.क्र. १८०५/२०२३, महाराष्ट्र पोलीस कायदा कलम ३३ डब्ल्यू अन्वये कारवाई करून रू. १२,५००/- इतका दंड वसूल करण्यात आला आहे.

(२), (३) व (४) समाज सेवी संस्थेच्या कोणत्याही पदाधिकाऱ्यांस मारहाण तसेच, पोलिसांना शिवीगाळ करुन मारहाण झाल्याबाबत चौकशीत आढळून आलेले नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## नाशिक जिल्हयात ऑनलाईन सायबर बिंगो (रोलेट )गेमच्या माध्यमातून जादा पैसे देण्याचे आमिष दाखवून झालेली फसवणूक

**(३४) ६५९९२ (२७-०९-२०२३). श्री.मुफती मोहम्मद इस्माईल अब्दुल खालिक (मालेगांव मध्य) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नाशिक जिल्हयात ऑनलाईन सायबर बिंगो (रोलेट) गेमच्या माध्यमातून जादा पैसे देण्याचे आमिष दाखवून एकास ३६ लाख ८० हजार रुपयांना फसवणूक केल्याची बाब माहे एप्रिल, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास,उक्त प्रकरणी लासलगांव पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,चौकशीत काय आढळून आले, त्याअनुषंगाने अशा गेमना आळा घालण्याच्यादृष्टिने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास,विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०४-०१-२०२४) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) आर्थिक लाभाचे अमिष दाखवून ऑनलाईन बिंगो गेम खेळण्यास भाग पाडून आर्थिक फसवणूक केल्याबद्दल लासलगाव पोलीस ठाणे, नाशिक ग्रामीण येथे गु.र.क्र. ७५/२०२३, भा.दं.वि. कलम ४२०, ३४, माहिती व तंत्रज्ञान अधिनियम, २००० कलम ६६ (ड) अन्वये दिनांक १५.०४.२०२३ रोजी ६ आरोपींविरूद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

(३) सदर गुन्ह्यातील १ आरोपीस अटक करण्यात आली असून, ४ आरोपींना मा. अपर जिल्हा सत्र न्यायालय, निफाड यांनी अटकपूर्व जामीन मंजूर केला आहे. तसेच, एका आरोपीचा तपास सुरू आहे.

ऑनलाईन जुगारातून होणारे दुष्परीणाम, सायबर गुन्हे, सोशल मिडीयाचा योग्य वापर याबाबत पोलीस अधिकारी/कर्मचारी यांच्याद्वारे विविध १९५८ शाळा/महाविद्यालयांत भेटी देऊन ३,५३,५९१ शिक्षक, विद्यार्थी, पालक तसेच सामान्य नागरिकांची जनजागृती करण्यात आली आहे.

ऑनलाईन गेमवर नियंत्रण ठेवण्याच्या दृष्टीने केंद्र सरकारच्या इलेक्ट्रॉनिक्स व माहिती तंत्रज्ञान विभागामार्फत माहिती व तंत्रज्ञान कायद्यांतर्गत Information Technology (Intermediary Guidelines and Digital Media Ethics Code) Rules, २०२१, दिनांक ०६.०४.२०२३ रोजी राजपत्रामध्ये प्रसिद्ध करण्यात आले आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मालेगांव (जि.नाशिक) शहरातील मुख्य चौकापैकी सोयगांव परिसरात डी के चौकाची झालेली दूरवस्था**

**(३५) ६६००९ (२४-०८-२०२३). श्री.मुफती मोहम्मद इस्माईल अब्दुल खालिक (मालेगांव मध्य) :** सन्माननीय **राज्य उत्पादन शुल्क मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मालेगांव (जि.नाशिक) शहरातील मुख्य चौकापैकी सोयगांव परिसरातील डी के चौक हा प्रतिष्ठित चौक म्हणून ओळख असलेल्या चौकात गेल्या काही वर्षापासून वाईन व बीअर शॉप आदिंची दुकाने बांधण्यात आलाचे माहे मे, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मदयपी लोकांची ये जा या परिसरात असल्याने नागकरिकांनी या चौकाचे नामकरण करुन पिके चौक असे केले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या चौकात वाईन/बीअर ची दुकाने असल्याने परिसराची दयनीय अवस्था झाली असून परिसरात प्लॅस्टिकमुळे प्रदुषण वाढलेले, वाहन पार्किंगची /रहदारीची समस्या , आदि समस्या निर्माण झाल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) तसेच सदरहू वाईन व बीअर शॉप हे शाळा व कॉलेजपासून जवळच असून पोलिस आणि महानगरपालिकेचे याकडे दुर्लक्ष होत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,त्यात काय आढळून आले आहे, त्यानुषंगाने दुकान बंद करण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. शंभूराज देसाई (२३-११-२०२३) :** (१) मालेगाव शहरातील सोयगाव या भागातील डी.के.चौक परिसरात दोन अबकारी अनुज्ञप्त्या मंजूर असून यापैकी एक एफएलबीआर-२ (किरकोळ बीअरची विक्री) अनुज्ञप्ती सन २००९ मध्ये मंजूर करण्यात आली आहे. तर, एक एफएल-२ (किरकोळ विदेशी मद्याची विक्री) अनुज्ञप्ती सन २०१८ मध्ये स्थलांतरित करण्यात आली आहे. या दोन्ही अनुज्ञप्त्या माहे मे, २०२३ पूर्वीच त्या ठिकाणी कार्यरत आहेत.

(२) व (३) हे खरे नाही.

(४) हे खरे नाही.

सदरहू दोन्ही अबकारी अनुज्ञप्ती या महाराष्ट्र विदेशी मद्य नियम १९५३ चे कलम २५ (२) (बी) नुसार अंतरनिर्बंधमुक्त असून परिसरात २५० मिटर अंतराचे आत कोणतीही शाळा अथवा महाविद्यालय असल्याचे निदर्शनास आले नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**रावेर व यावल (जि. जळगांव) तालुक्यात केळीचे घड चोरीस नेण्याच्या घटनांत वाढ झाल्याबाबत**

**(३६) ६६१८४ (२७-०९-२०२३). श्री.शिरीष चौधरी (रावेर), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.अशोकराव चव्हाण (भोकर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्रीमती सुलभा खोडके (अमरावती), श्री.बळवंत वानखडे (दर्यापूर), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.संजय जगताप (पुरंदर), श्री.विक्रमसिंह सावंत (जत), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.हिरामण खोसकर (इगतपूरी) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रावेर व यावल, (जि. जळगांव) तालुक्यात मागील दोन महिन्यापासून सतत केळीच्या झाडांचे नुकसान करणे व केळीचे घड चोरुन नेणे, या घटनांमध्ये दिवसेदिवस वाढ झाली असल्याचे माहे एप्रिल, २०२३ च्या पहिल्या आठवडयात निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यासंदर्भात शासनाने चौकशी करुन या गुन्हयांना तातडीने आळा घालण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१२-१२-२०२३) :** (१) होय.

रावेर, ता. यावल, जि. जळगाव येथे अशा १० घटना जानेवारी २०२३ ते जून २०२३ दरम्यान घडल्या आहेत.

(२) सदर घटनांच्या अनुषंगाने १० गुन्हे दाखल करण्यात आले असून ८ गुन्हे उघडकीस आली आहेत. सदर ८ गुन्ह्यात १५ आरोपींना अटक करण्यात आले आहे. तसेच ४ गुन्ह्यांमधील ८ आरोपींविरूध्द दोषारोपपत्र दाखल करण्यात आले आहे. सर्व गुन्ह्यातील आरोपींविरूध्द प्रतिबंधक कारवाई करण्यात आली आहे. तसेच रावेर व यावल तालूक्यातील शिवारात रात्रगस्त व ग्राम सुरक्षा दल, पोलीस मित्र गुप्त बातमीदार सक्रिय करण्यात आले असून घटनांवर प्रतिबंध घालण्यात येत आहे.

(३) विलंब झालेला नाही.

---

**पुणे जिल्ह्यातील सिंहगड-पानशेत परिसरात हॉटेल, फार्म हाऊस, ढाब्यावर देशी, विदेशी दारूची विनापरवाना विक्री होत असल्याबाबत**

**(३७) ६६२७४ (२४-०८-२०२३). श्री.भिमराव तापकीर (खडकवासला) :** सन्माननीय **राज्य उत्पादन शुल्क मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे जिल्ह्यातील सिंहगड-पानशेत परिसरात हॉटेल, फार्म हाऊस, ढाब्यावर देशी, विदेशी दारूची विनापरवाना विक्री होत असल्याचे माहे मे, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त ठिकाणी वेळेचे पालन न करता अगदी पहाटेपर्यंत बेकायदा पार्ट्या सुरु असून संबंधित प्रशासनाचे त्यावर नियंत्रण नसून याबाबत स्थानिक नागरिक वारंवार तक्रार करीत असून त्यासंदर्भात कुठलीही कारवाई होत नसल्याचे निदर्शनास आले आहे , हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले,त्यानुषंगाने संबंधितांवर कारवाई करण्यासंदर्भात कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. शंभूराज देसाई (११-१२-२०२३) :** (१) हे खरे आहे.

हॉटेल, फॉर्म हाऊस, ढाब्यावर देशी विदेशी मद्याची अवैध निर्मिती, वाहतूक व विक्री होत असल्याचे प्राप्त तक्रारीद्वारे तसेच गस्तीच्या वेळी निदर्शनास येताच संबंधीत कार्यक्षेत्रीय अधिकारी यांच्यामार्फत वेळोवेळी कारवाई केली जाते. त्यानुसार पुणे जिल्ह्यातील सिंहगड, पानशेत परिसरात माहे जानेवारी ते सप्टेंबर, २०२३ या कालावधीत हातभट्टी दारु

निर्मिती व विक्री, गावठी दारु वाहतुक, अवैध ताडी विक्री, अवैध देशी/विदेशी दारु विक्री व वाहतुक इत्यादी संदर्भात एकूण ३३ गुन्हे नोंदविलेले असून सदर गुन्हांमध्ये एकूण ३३ आरोपींना अटक करण्यात आलेली आहे. या सर्व कारवाईत एकूण रु.१६,०२,१५५/- किंमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.
(२) हे खरे नाही.
(३) विहित वेळेनंतर सुरु असलेल्या एफएल-३ आस्थापनांवर कडक कारवाई करण्याचे निर्देश आयुक्त, राज्य उत्पादन शुल्क कार्यालयामार्फत देण्यात आलेले आहेत.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**बारामती जिल्हयातील शिरसाई उपसा सिंचन योजनेबाबत**

**(३८) ६६३२० (३१-०८-२०२३). श्री.संजय जगताप (पुरंदर), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.सुरेश वरपुडकर (पाथरी), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.विक्रमसिंह सावंत (जत), श्री.ऋतुराज पाटील (कोल्हापूर दक्षिण), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.बळवंत वानखडे (दर्यापूर), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.हिरामण खोसकर (इगतपूरी), श्रीमती सुलभा खोडके (अमरावती), श्री.जितेश अंतापूरकर (देगलूर) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) बारामती जिल्हयातील शिरसाई उपसा सिंचन योजना मायनर ८ पासून २५० ते ३०० मीटर बंद जलवाहिनी करुन जळगांव सुप्यालगतच्या जगताप वस्ती, ओढा तसेच भोसलेवस्ती ओढयात पाणी सोडण्याची मागणी करण्यात आली असल्याचे माहे एप्रिल, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त ओढयात पाणी सोडल्यास आसपासच्या शेतातील पिकांची तसेच जनावरांना पाणी मिळणार आहे, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, ओढयात पाणी सोडण्याकडे शासन दुर्लक्ष करित असल्याने या विभागातील स्थानिक ग्रामस्थांनी संबंधित जिल्हाधिकारी कार्यालयासमोर उपोषणास बसण्याचा इशारा दिला आले, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन ओढयात पाणी सोडण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (११-०१-२०२४) :** (१), (२) व (३) होय, हे खरे आहे.
जनाई शिरसाई उपसा सिंचन योजनेच्या मंजूर प्रकल्प अहवालात जगताप वस्ती ओढा तसेच भोसलेवस्ती ओढ्याचा समावेश नसल्याने सदर ठिकाणी पाणी सोडण्यात येत नाही. परंतु या वर्षी उन्हाळा हंगामात स्थानिक ग्रामस्थांच्या मागणीच्या अनुषंगाने जगताप वस्ती जवळील हनुमान बंधाऱ्यात दि.०७.०५.२०२३ रोजी ०.६ द.ल.घ.फू. इतके पाणी देण्यात आलेले होते. भोसलेवस्ती ओढा हनुमान बंधाऱ्यापासून १ कि.मी. अंतरावर खालच्या बाजूस असल्याने सदरील ओढ्यात पाणी सोडण्याकडे दुर्लक्ष केलेले नाही.
(४) जगतापवस्ती ओढा, भोसलेवस्ती ओढा याचा प्रकल्प अहवालात समाविष्ट नसल्याने प्रकल्प अहवालात समाविष्ट करणे आवश्यक आहे. तसेच सदर तलाव भरण्यासाठी मायनर ८ ची वहन क्षमता वाढविणे आवश्यक आहे, याबाबत दि.२५.०९.२०२३ रोजी कार्यकारी संचालक, महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळ, पुणे यांच्या अध्यक्षतेखाली उपोषणकर्ते यांच्यासमवेत बैठक घेण्यात आली असुन बैठकीमध्ये शासनाचे विकेंद्रीत जलसाठे धोरण अंतर्गत मागणी केलेले तलाव भोसले वस्ती, जगताप वस्ती ओढा, सावकार वस्ती पाझर तलावात पाणी सोडण्यासाठी करावयाच्या कामाचे अंदाजपत्रकासह प्रस्ताव तयार करून सादर करण्याचे निर्देश दिले आहेत. तसेच सदर कामासाठी जिल्हा नियोजन समिती अथवा तत्सम योजनेतुन निधी उपलब्ध करून देण्याबाबतची कार्यवाही क्षेत्रीय स्तरावर प्रगतीपथावर आहे.

(५) प्रश्न उदभवत नाही.

---

**मुंबई, पुण्यासह आंतरराज्य कुख्यात शस्त्र तस्करांकडून शस्त्रांस्त्रांची तस्करी होत असल्याबाबत**

**(३९) ६६३८३ (२७-०९-२०२३). श्री.सिध्दार्थ शिरोळे (शिवाजीनगर) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई, पुण्यासह आंतरराज्य कुख्यात शस्त्र तस्करी टोळयांनी कोल्हापूर, सांगलीसह पश्चिम महाराष्ट्रात जीवघेण्या शस्त्रांचा खुलेआम बाजार सुरू केला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सांगलीत जिल्ह्यात दिनांक ७ मे, २०२३ रोजी वा त्यासुमारास पहाटे कोम्बिंग ऑपरेशनमध्ये ७ गावठी पिस्तूल, १७ काडतुसे, २८० नशेच्या गोळयांसह गांजासाठा हस्तगत करून पोलिसांनी ७ गुंडांना अटक केली, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, कोल्हापूर परिक्षेत्रात २०२१-२२ व जानेवारी ते एप्रिल २०२३ या काळात ३२५ पेक्षा जादा गुन्ह्यात ३५५ पिस्तुल, रिव्हॉल्व्हरसह तब्बल ६५० जीवंत काडतुसांचा साठा हस्तगत करण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले,त्यानुसार या शस्त्रांच्या तस्करीवर तात्काळ बंदी आणून गुन्हेगारी रोखण्याबाबत शासन काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०२-१२-२०२३) :** (१), (२) व (३) दिनांक ७ मे, २०२३ रोजी कोम्बिंग ऑपरेशनमध्ये ७ गावठी पिस्तुल, १७ काडतुस, २८० नशेच्या गोळयांसह गांजासाठा हस्तगत करुन पोलीसांनी ७ व्यक्तींना अटक केली आहे. याबाबत सांगली जिल्ह्यातील पोलीस ठाण्यात ४ गुन्हे दाखल आहेत.

कोल्हापूर परिक्षेत्रात अवैध शस्त्र तस्करी संदर्भात सन २०२१ ते एप्रिल, २०२३ पर्यंत एकूण ३४४ गुन्हे दाखल असून त्यामध्ये ३५७ अवैध शस्त्रे व ८३६ काडतूस हस्तगत करण्यात आली आहेत.
(४) उक्त प्रकरणी चौकशी करण्यात येवून विना परवाना शस्त्र बाळगल्याप्रकरणी संबंधिताविरोधात गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. त्याचप्रमाणे अभिलेखावरील गुन्हेगारांना वेळावेळी चेक करुन त्यांचेवर प्रभावी प्रतिबंधात्मक कारवाई करण्यात येत आहे. त्याप्रमाणे अवैध शस्त्र तस्करी रोखण्यासाठी कोंबिग ऑपरेशन, रात्रगस्त व अचानक नाकाबंदी मोहिम राबविण्याबाबत घटक प्रमुखांना सूचना देण्यात आलेल्या आहेत. अवैध शस्त्रे बाळगणाऱ्यांविरुद्ध शस्त्र अधिनियम १९५९ व शस्त्र नियम २०१६ अन्वये गुन्हे दाखल करण्यात येतात.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मंडणगड तालुक्यातील ( जि. रत्नागिरी ) भारजा नदीवर धरण बांधण्याबाबत**

**(४०) ६६४६१ (०३-०९-२०२३). श्री.योगेशदादा कदम (दापोली) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) तोंडली आणि आतले (ता.मंडणगड, जि.रत्नागिरी) या दोन महसुली गावाच्या सिमे लागतच्या सरहद्दी वरून बाराही महिने पाण्याने दुथडी वरून वाहणाऱ्या भारजा नदीवर धरण बांधण्यात यावा म्हणून तेथील ग्रामस्थांनी मागील अनेक वर्षांपासून शासनाकडे तसेच ग्रामस्थ व लोकप्रतिनिधी यांनी अधिक कालावधीपासून जलसंपदा मंत्री, पालकमंत्री रत्नागिरी जिल्हा कार्यकारी अभियंता रत्नागिरी पाटबंधारे विभाग, आदिंकडे लेखी निवेदनाद्वारे सातत्याने मागणी केलेली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, धरण बांधण्यासाठी म्हणून योग्य जागा असलेल्या आतले आणि तोंडली गाव दरम्यान भारजा नदीचे पाणी धरण बांधुन अडविले तर तोंडली,आतले, वडवली, आंबवणे, कोन्हवली, ताम्हाणे, उन्हवरे आणि दहिंबे गावाच्या पिण्याच्या पाण्याची टंचाई दुर होईल, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन भारजा नदीवर धरण बांधण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१२-०१-२०२४) :** (१) हे खरे नाही,

तोंडली आणि आतले (ता. मंडणगड, जि. रात्नागिरी) या दोन महसुली गावाच्या सीमेलगतच्या सरहद्दीवरुन बाराही महिने पाण्याने दुथडी भरुन वाहणाऱ्या भारजा नदीवर धरण बांधण्यात यावे असे लेखी निवेदन प्राप्त नाही.

(२) प्रश्न उद्भवत नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

### सावंगी म्हाळसा (ता.जिंतूर, जि.परभणी) येथे मुख्यमंत्री सौर उर्जा प्रकल्प प्रलंबित असल्याबाबत

**(४१) ६६८२३ (२७-०९-२०२३). डॉ.राहूल पाटील (परभणी) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सावंगी म्हाळसा (ता.जिंतूर, जि.परभणी) येथे मुख्यमंत्री सौर उर्जा प्रकल्पाच्या अंतर्गत ५ मेगावॅटचा सौर उर्जा प्रकल्पाचे काम गेल्या काही वर्षापासून प्रलंबित आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर प्रकल्प संबंधित कंपनीच्या अधिकाऱ्यांच्या हलगर्जीपणामुळे गेल्या ५ वर्षापासून प्रलंबित आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी करुन उक्त सौर उर्जा प्रकल्पाचे काम प्रलंबित ठेवण्यास जबाबदार असणाऱ्या अधिकाऱ्यावर कोणती कारवाई केली तसेच सदरहू प्रकल्प पूर्ण करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०३-०१-२०२४) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) व (३) महानिर्मिती कंपनीने मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजना अंतर्गत विदर्भ, मराठवाडा, पश्चिम महाराष्ट्र व उत्तर महाराष्ट्रासाठी दि. १५.०३.२०१९ रोजी १८४ मेगावॅट सौर ऊर्जाप्रकल्प उभारण्याबाबत निविदा प्रसिध्द केली होती. निविदाप्रक्रियेअंती मेसर्स वारी एनर्जी लि. यांना १८४ मेगावॅट क्षमतेचे सौर ऊर्जा प्रकल्प उभारण्याकरीता दि. १८.०१.२०२० रोजी इरादा पत्र देण्यात आले. यामध्ये सांगवी म्हाळसा (ता. जिंतूर जि. परभणी) येथील ५ मेगावॅट क्षमतेचा सौरऊर्जा प्रकल्पाचा समावेश होता.

सदर प्रकल्पासाठी महसूल विभागाने यांनी १० हेक्टर जमिनीचा ताबा महानिर्मिती कंपनीस दि. २५.०५.२०१८ दिला. महानिर्मिती कंपनीने दि. ३१.०७.२०२१ रोजी सदर जमीन मे. वारी एनर्जी लि. यांना सौर ऊर्जा प्रकल्प उभारण्यासाठी हस्तांतरित केली.

परंतु प्रथमत: कोरोना महामारी व तद्नंतर केंद्र शासनाच्या दि. ०९.०३.२०२१ रोजीच्या निर्देशानुसार Basic Custom Duty त वाढ केल्याने प्रकल्प विकासकाने प्रकल्प अव्यवहार्य होत असल्याचे सांगून प्रकल्पाचे वित्तीय समाप्ती (Financial Closer) केले नाही.मे.वारी एनर्जी लि. कंपनी प्रकल्पाचे काम लवकर पूर्ण करण्यासाठी वारंवार कळवून सदर कंपनीने प्रकल्पाचे काम सुरु न केल्याने कंपनीचे बँक हमी जप्त करुन इरादा पत्र रद्द करण्याची प्रक्रिया सुरु आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मिरज (जि.सांगली) येथे सरकारी नोकरीच्या अमिषाने ५१ जणांची केलेली फसवणूक**

**(४२) ६६९०६ (२७-०९-२०२३). श्री.विश्वजित कदम (पलूस कडेगाव), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्य शासनाच्या आरोग्य विभागातील नोकर भरतीवेळी नोकरी देतो असे सांगत मिरज (जि.सांगली) तालुक्यातील ५१ जणांची ५८ लाख रुपयांची फसवणूक झाल्याचे नुकतेच उघडकीस आले आहे,हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याप्रकरणी मिरज ग्रामीण पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल झाला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या गुन्हयाची शासनाने तातडीने चौकशी करुन संबंधित दोषींवर कोणती कठोर कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१२-१२-२०२३) :** (१) शासनाच्या विविध विभागामध्ये वेगवेगळया पदावर वेगवेगळ्या ठिकाणी बोलवून नोकरी लावण्याचे अमिष दाखवून विविध ठिकाणच्या ५१ जणांची रू.५८,५५,०००/- इतक्या रकमेची फसवणुक झाल्याचे निष्पन्न झाले आहे.

(२) व (३) सदर प्रकरणी फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारींनुसार मिरज ग्रामिण पोलीस स्टेशन येथे गु.र.नं. २१०/२०२३ भा.दं.वि. कलम ४१९,४०६,४२०,५०४,३४, ४७१,४६५,४६८ अन्वये दि.१४/०५/२०२३ रोजी गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदर गुन्ह्यात ०२ आरोपींना अटक करण्यात आले असून ०२ आरोपींचा शोध सुरु आहे. आरोपींकडून प्राप्त झालेल्या तपशीलाच्या आधारे गुन्ह्यांचा पुढिल तपास सुरु आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**तासगाव व कवठेमंकळ (जि. सांगली) तालुक्यातील द्राक्ष शेतकऱ्यांची फसवणूक झाल्याबाबत**

**(४३) ६६९६८ (२७-०९-२०२३). श्री.विश्वजित कदम (पलूस कडेगाव) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) तासगाव व कवठेमंकळ (जि. सांगली) तालुक्यातील १३ द्राक्षे उत्पादक शेतकऱ्यांची ४२ लाख ४८ हजार ८९० रुपयांना दिल्ली येथील एका व्यक्तीने फसवणूक केली आहे , हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या विरोधात तासगाव पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाला आहे, हे ही खरे आहे काय

(३) असल्यास, यासंदर्भात शासनाने चौकशी करुन संबधित दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१२-१२-२०२३) :** (१) सांगली जिल्हातील मणेराजूरी, अंजनी, मळणगांव, सावळज, खुजगांव येथील एकूण १४ द्राक्ष उत्पादक शेतकऱ्यांची एकुण रू.४२,७०,८९०/- ची फसवणूक झाल्याचे निर्दशनास आले आहे.

(२) व (३) सदर प्रकरणी तासगांव पोलीस स्टेशन, सांगली येथे गु.र.नं. २२६/२०२३ भा.द.वि. कलम ४२० प्रमाणे दि. १७/०५/२०२३ रोजी गुन्हा दाखल करण्यात आला असून आरोपीचा शोध घेणे सूरू आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

### सांगली जिल्हयात बऱ्याच ठिकाणी नशेच्या गोळयांचा साठा जप्त केल्याबाबत

**(४४) ६६९७२ (२७-०९-२०२३). श्री.विश्वजित कदम (पलूस कडेगाव) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सांगली जिल्हयात बऱ्याच ठिकाणी नशेच्या गोळयाची विक्री करणारी टोळी एलसीबी पोलीसांनी पकडली असून त्यांच्याकडून नशेच्या गोळयांचा मोठया प्रमाणात साठा जप्त करण्यात आला असल्याचे माहे मे २०२३, मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, नशेच्या गोळयांचे सेवन करण्यात येवून गुन्हेगारी होत असल्याचे आढळून आले आहे, हे ही खरे आहे काय

(३) असल्यास, नशेच्या गोळयांची विक्री करणाऱ्या टोळीवर कठोर कारवाई करण्याबाबत तसेच या प्रकरणाला आळा घालण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१२-१२-२०२३) :** (१) होय.

(२) या गोळयातून येणाऱ्या नशेमूळे काही गुन्हे घडण्याची शक्यता नाकारता येत नाही.

(३) सांगली जिल्ह्यात माहे मे, २०२३ मध्ये नशेच्या गोळी विक्री करण्यांऱ्याविरूध्द महात्मा गांधी चौक पोलीस स्टेशन, सांगली शहर पोलीस स्टेशन व मिरज शहर पोलीस स्टेशन येथे प्रत्येकी एक अशी ३ गुन्हे दाखल करण्यात आली आहेत. यामध्ये एकूण ११ आरोपी अटक करण्यात आलेली आहेत.

अंमली पदार्थ विरोधी कारवाई करीता सांगली जिल्हास्तरावर सांगली जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली NCORD समिती नेमली असून त्यानूसार प्रतिबंधात्मक कार्यवाही केली जाते. अंमली पदार्थ विरोधात समाज प्रबोधन केले जात असून नशेच्या गोळया विक्री व खेरदी करणाऱ्यांवर पोलीसांमार्फत कडक कारवाई केली जात आहे.

(४) विलंब झालेला नाही.

---

### रत्नागिरी जिल्हयातील बाणकोटच्या सागरी हद्दीत हजारो शेळया-मेंढयांची वाहतूक करणारी संशयास्पद बोट आढळून आल्याबाबत

**(४५) ६६९७८ (२७-०९-२०२३). श्री.भास्कर जाधव (गुहागर) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रत्नागिरी जिल्हयातील बाणकोटच्या सागरी हद्दीत हजारो शेळया-मेंढयांची वाहतूक करणारी संशयास्पद बोट माहे एप्रिल २०२३ मध्ये वा त्यादरम्यान कस्टम विभागाला आढळून आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर बोटीवर किती शेळया-मेंढया होत्या, बोटीचा मालक कोण, शेळया-मेंढयांची वाहतूक कुठे करण्यात येत होती, त्यासाठी आवश्यक असलेले परवाने संबंधितांकडे होते काय, आदींबाबत सखोल चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, तद्अनुषंगाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) असल्यास, बोटीवरील शेळया-मेंढयांपैकी अनेक शेळया-मेंढयांचा मृत्यू झाला,असून किती शेळया-मेंढयांचा मृत्यू झाला, त्यांच्या मृत्यूचे कारण काय आणि त्यास जबाबदार संबंधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२८-१२-२०२३) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) उपरोक्त बोटीवर एकुण ३३९८ शेळया-मेढ्या आढळुन आलेल्या आहेत. बोटीचे मालक हे गुजरात राज्यातील आहेत.सदरची वाहतुक ही अहमदाबादवरुन ट्रकव्दारे विजयदुर्ग जेट्टी व तेथुन समुद्रमार्गे बोटीव्दारे दुबई येथे करण्यात येत होती. संबंधीताकडे आवश्यक असणारे परवाने हे बनावट असल्याचे तपासत निष्पन झाले असुन, संबंधित विभागाशी पत्रव्यवहार करुन ते कागदपत्र हे बनावट असल्याची खात्री करण्यात आली आहे.

गुन्हयातील आरोपी यांनी गैरमार्गाने आर्थिक फायदा मिळविण्यासाठी कस्टम विभाग विजयदुर्ग व महाराष्ट्र मेरीटाईम बोर्ड मुंबई यांचे बनावट कागदपत्र तयार केले असल्याचे तपासात निदर्शनास आले आहे.
(३) सदर बोटीवर असणाऱ्या एकुण ३३९८ शेळया-मेढ्यांपैकी सर्व शेळ्या-मेढ्यां या मयत झाल्या असुन Respiratory Distress And Haemorrhagie Septicemin या कारणामुळे मयत झाले असल्याचे वैद्यकीय अहवालात निष्पन झाले आहे. गुन्ह्यातील संबंधीतांवर ग.र.क्र.२४/२०२३ कलम ४६५, ४६८, ४७१, ४७२, ४२०, २०१, ४२९ व ३४ भा.द.वि.सह महाराष्ट्र प्राणी संरक्षण अधिनियम कलम ९ (अ) व ११, प्राण्यावरील क्रुरता प्रतिबंधक कायदा १९६० कलम ११ (ए) (डी) (इ) (एच) (के),महाराष्ट्र पोलीस अधिनियम कलम ११९ अन्वये यलोगेट पोलीस ठाणे येथे गुन्हा दाखल करण्यात आला असुन पुढील तपास सुरु आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## गुंगीचे औषध देऊन बेशुध्द झालेल्या भटक्या गाईची हत्याकेली असल्याबाबत

**(४६) ६७०४० (२७-०९-२०२३). श्री.रमेश कोरगांवकर (भांडूप पश्चिम) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) गुंगीचे औषध देऊन बेशुध्द झालेल्या भटक्या गाईना गाडीच्या डिक्कीत भरुन तस्करी करणा-या सोयब करके या आरोपीला ( रा खैरणे गाव ) पोलिसांनी अटक केल्याची घटना माहे मे,२०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, कल्याण बाजारपेठ पश्चिमेकडील रेतीबंदर खाडी परिसरात जीना कारखान्याजळ सार्वजनिक मोकळी जागेवर गाईना आणून त्यांची कत्तल केली जात असल्याचे देखील निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत शासनाने सखोल चौकशी केली आहे काय,चौकशीत काय आढळून आले,
(४) असल्यास,चौकशीच्या अनुषंगाने संबधित दोषींविरुध्द काय कारवाई केली वा करण्यात येत आहे, तसेच गोहत्या रोखण्याबाबत शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास,विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०३-०१-२०२४) :** (१), (२), (३) व (४)
ठाणे शहर पोलीस आयुक्तालयातील परिमंडळ ३ कल्याण मधील बाजारपेठ पोलीस ठाणे येथे माहे एप्रिल २०२३ महिन्यात रेतीबंदर खाडी परिसरात जिना कारखान्याजवळ गोवंश जातीचे मांस व दोन जिवंत गायी मिळून आल्याने गु.र.क्र. ९७/२०२३ महाराष्ट्र प्राणी संरक्षण (सुधारणा) अधिनियम १९९५ चे कलम ५(क), ९(अ), सह भारतीय दंडसंहिता कलम ३४ प्रमाणे गुन्हा दाखल असून सदर गुन्हयात सोयब निजाम करके सह दोन असे एकुण ०३ आरोपींना अटक करण्यात आली. त्यांच्याविरुद्ध मा. न्यायालयात दोषारोप पत्र सादर करण्यात आले आहे. तसेच सदर आरोपी जामीनावर सुटल्यानंतर ०२ आरोपींवर सीआरपीसी १०७ प्रमाणे व ०१ आरोपींवर सीआरपीसी ११० प्रमाणे प्रतिबंधक कारवाई करण्यात आली आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## काळवटी साठवण तलाव ( ता.अंबाजोगाई, जि. बीड) या तलवाची अर्धा मीटरने उंची वाढवण्या बाबत

**(४७) ६७१८२ (०३-०९-२०२३). श्रीमती नमिता मुंदडा (केज) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) काळवटी साठवण तलाव, (ता. अंबाजोगाई, जि. बीड) या साठवण तलवाची अर्धा मीटरने उंची वाढवण्यासाठी राज्यस्तरीय प्रकल्प मान्यता समितीने मान्यता दिली असून त्यासाठी शासनाने सन २०१९ मध्ये ०३ कोटी ३० लक्ष रुपयांचा निधी मंजूर केला होता मात्र त्यातील फक्त ५० लक्ष रुपयांचा निधी शासनाने उपलब्ध करून दिल्याने अपुऱ्या निधीमुळे मागील चार वर्षापासून सदर तलावाचे काम प्रलंबित आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, काळवटी साठवण तलवाची अर्धा मीटरने उंची वाढवण्यासाठी मंजूर निधी उपलब्ध करून देणेबाबतची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी जलसंपदा मंत्री यांचेकडे दिनांक १५ मार्च, २०२३ रोजी वा त्यासुमारस निवेदनाद्वारे केली होती, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करून निधी उपलब्ध करून देण्याबाबात कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०८-१२-२०२३) :** (१) होय.
महाराष्ट्र शासन, नगर विकास विभाग शासन निर्णय क्र. नगरो २०१९/प्र.क्र.२४९/कावि, मंत्रालय, मुंबई यांच्या दिनांक ०६.०९.२०१९ अन्वये काळवटी साठवण तलाव, ता. अंबाजोगाई, जि.बीड या योजनेच्या उंचीवाढ कामास काही अटींच्या अधीन राहून मंजूरी प्रदान करण्यात आलेली आहे. सदरील काम अंबाजोगाई नगर परिषदेने जलसंपदा विभागामार्फत पूर्ण ठेव तत्वावर करावयाचे असून, सदर काम विहीत केलेल्या कालमर्यादेत पूर्ण करावे, असे शासन निर्णयात नमुद आहे. तथापि अद्यापपर्यंत निधी वर्ग करण्यात आलेला नाही.
(२) होय.
(३) क्षेत्रिय कार्यालयामार्फत सदर योजनेकरीता आवश्यक निधी मुख्याधिकारी, नगर परिषद, अंबाजोगाई यांचेकडून प्राप्त होणेसाठी वारंवार मागणी करुनही अद्याप निधी प्राप्त झालेला नाही. निधी प्राप्त झाल्यानंतर कामे करणे नियोजित आहे.
(४) नगर परिषद, अंबाजोगाई यांचे कडून निधी प्राप्त नाही.

---

## धरणगाव (जि.जळगाव) तालुक्यातील पाळधी येथे दिंडीवर दगडफेक झाल्याबाबत

**(४८) ६७२७९ (२९-०८-२०२३). श्री.नारायण कुचे (बदनापूर) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) धरणगाव (जि. जळगाव) तालुक्यातील पाळधी येथे समाजकंटकांनी दिंडीवर दगडफेक केली असल्याचे माहे मार्च,२०२३ च्या शेवटच्या आठवडयात निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या दगडफेकीत दुकाने, वाहनांची मोठी तोडफोड झाली असून या घटनेमुळे येथे तणाव निर्माण झाला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, यासंदर्भात शासनाने चौकशी करुन येथील कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्याबाबत कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२७-१२-२०२३) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) व (३) सदर प्रकरणी धरणगांव पो.स्टे. येथे दाखल तीन गुन्ह्यांमध्ये खालीलप्रमाणे कार्यवाही करण्यात आली आहे :-
(अ) धरणगांव पो.स्टे. गु.र.नं.९०/२०२३ भादंवि कलम १४३,१४७,१४९,३२४,४२७, म.पो.अधि. ३७ (१) (३) चे उल्लंघन १३५ प्रमाणे गुन्हा दाखल केला आहे. सदर गुन्ह्यात एकूण ५२ आरोपिंना गु.र.नं.९१/२०२३ मध्ये अटक करण्यात आली असून, गु.र.नं.९०/२०२३ मध्ये त्यांना सीआरपीसी ४१(अ) ची नोटीस देण्यात आली आहे. तसेच त्यांच्यावर सीआरपीसी कलम १०७ प्रमाणे प्रतिबंधक कारवाई करण्यात आलेली आहे.
(ब) धरणगांव पो.स्टे. गु.र.नं.९१/२०२३ भादंवि कलम ३०७,३५३,३३२,१४३,१४७, १४८,१४९,३२३,४२७ क्रि.लॉ. अमेंडमेंट कलम ३ व ७ सह सार्व.मालमत्ता नुकसान अधि.१९८४ चे कलम ३ सह म.पो.अधि.कलम ३७(१)(३) चे उल्लंघन १३५ प्रमाणे गुन्हा दाखल केला आहे. सदर गुन्ह्यातील ७१ आरोपिंना अटक करण्यात आली असून ५७ आरोपितांवर सीआरपीसी १०७ प्रमाणे व १ आरोपीवर सीआरअपीसी ११० प्रमाणे प्रतिबंधात्मक कारवाई करण्यात आली आहे.
(क) धरणगांव पो.स्टे. गु.र.नं.९२/२०२३ भादंवि कलम १४३,१४७,१४८,१४९,३२४, २९५,४२७ म.पो.का.कलम

३७(१)(३) चे उल्लंघन १३५ प्रमाणे गुन्हा दाखल केला आहे. सदर गुन्ह्यात ६ आरोपितांना अटक करण्यात आली असून ६ आरोपितांवर सीआरपीसी कलम १०७ प्रमाणे प्रतिबंधक कार्यवाही करण्यात आलेली आहे.

सदर गुन्ह्यांमध्ये ९३ आरोपिंविरुध्द मा.न्यायालयात दोषारोपपत्र दाखल करण्यात आले आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

### मुंबईतील पवई येथील आय आयटीमधील विद्यार्थ्यांच्या आत्महत्येबाबत

**(४९) ६७२८० (२७-०९-२०२३). श्री.नारायण कुचे (बदनापूर), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), कॅप्टन आर. सेल्वन (सायन-कोळीवाडा), श्री.अशोकराव चव्हाण (भोकर) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पवई, मुंबई येथील आयआयटी कॅम्पसमधील वसतिगृहाच्या सातव्या मजल्यावरुन उडी मारुन दर्शन सोलंकी या विद्यार्थ्याने दिनांक १२ फेब्रुवारी, २०२३ रोजी वा त्यासुमारास आत्महत्या केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, ही आत्महत्या म्हणजे जाती भेदाचा बळी असल्याचा त्याच्या पालकांचा आरोप आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, यासंदर्भात शासनाने चौकशी करुन या आत्म्हत्येशी निगडीत दोषींवर कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२७-१२-२०२३) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) व (३) सदर आत्महत्या प्रकरणी मयताच्या वडीलांनी दिलेल्या तक्रारीवरुन पवई पो.ठाणे येथे गु.नो.क्र.१९५/२०२३ कलम ३०६, ५०६(२) भा.दं.वि. सह कलम ३(२)(अ) अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती (अत्याचारास प्रतिबंध) अधिनियम,१९८९ व सुधारणा सन २०१५ अन्वये दाखल करण्यात आला. सदर प्रकरणी दिनांक २४.०२.२०२३ च्या शासन पत्रान्वये पोलीस सहआयुक्त (गुन्हे), बृहन्मुंबई यांचे नेतृत्वाखाली एक विशेष तपास पथकाची (SIT) स्थापना करण्यात आली होती. सदर पथकाने गुन्ह्याचा तपास केला असता सदर गुन्हा हा जाती-भेदाचा बळी असल्याबाबत निष्पन्न झालेले नाही. सदर गुन्ह्यात आरोपिविरुध्द मा.विशेष सत्र न्यायालय, मुंबई येथे दोषारोपपत्र दाखल करण्यात आले आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

### मुंबई ऊर्जा पारेषण (स्टार लाईट) कंपनीच्या उच्चदाब वाहिनीमुळे बाधित होत असलेल्या शेतक-यांना बाजार भावाप्रमाणे मोबदला मिळणेबाबत

**(५०) ६७३०६ (२७-०९-२०२३). श्री.संजय केळकर (ठाणे) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई ऊर्जा पारेषण (स्टार लाईट) कंपनीच्या उच्चदाब वाहिनीमुळे बाधित होत असलेल्या शेतक-यांना बाजार भावाप्रमाणे मोबदला मिळावा या मागणीसाठी बदलापूरजवळील (जि.ठाणे) कासगाव येथे शेतक-यांनी आंदोलन केल्याचे माहे मे २०२३ , मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, स्टार लाईट कंपनीने निश्चित केलेल्या मनो-यासाठी ३०२५ रु. व लाईन खालील जमिनीसाठी ९०० रु. हा दर शेतक-यांच्या संपादीत केलेल्या जमिनीच्या भावापेक्षा कमी आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शेतक-यांना तात्काळ बाजार भावाप्रमाणे मोबदला देऊन दिलासा देण्याबाबत शासनाने काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०९-०१-२०२४) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) हे खरे नाही.

ऊर्जा विभाग शासन निर्णय दिनांक ०२.११.२०२२ अन्वये ६६ के.व्ही. व त्यापेक्षा अधिक क्षमतेच्या अति उच्चदाब पारेषण वाहिन्यांसाठी उभारण्यात येणाऱ्या मनोऱ्याने व्याप्त जागेचा तसेच अति उच्च दाब पारेषण वाहिन्याच्या पट्टयाखालील जमिनीच्या नुकसान भरपाईपोटी मोबदला देण्यासंदर्भात सुधारित धोरण निश्चित केले आहे. त्यानुषंगाने अनुसरावयाची कार्यपध्दती दिनांक ०१.१२.२०२२ रोजीच्या शासन निर्णयान्वये निश्चित केली आहे.
स्टार लाईट कंपनीच्या प्रकल्पामुळे अंबरनाथ तालुक्यातील २८ गावे बाधित होत आहेत. त्यापैकी २६ गावांसाठी प्रति चौ.मी. रु.३०२५/-व चामटोली गावासाठी रु. ४०२१/-, शिरगाव गावासाठी रु.८७६८/- असा मूल्यांकन दर निश्चित करण्यात आला आहे. सदरची दरनिश्चिती उपरोक्त दिनांक २.११.२०२२ रोजीच्या शासन निर्णयानुसार मनोऱ्याने व्याप्त बाधित क्षेत्रासाठी रेडिरेकनरचा दर व मागील ३ वर्षातील झालेल्या जमीन खरेदी-विक्री व्यवहार विचारात घेऊन, तसेच उल्हासनगार विभागातील अंबरनाथ तालुक्यातील यापुर्वी सुरू असलेल्या प्रकल्पातील काही गावांमधील भूसंपादन प्रकल्पाकरिता देण्यात आलेला दर विचारात घेवून, सदर दराच्या दुप्पट दराने मनोऱ्याने व्याप्त क्षेत्रासाठी मोबदला निश्चित करण्यात आला आहे. तसेच वाहिनीच्या पट्टयाखालील जमिनीसाठी वर नमूद केलेल्या दराच्या ३०% मोबदला निश्चितीची कार्यवाही करण्यात आलेली आहे.

त्यामुळे स्टर लाईट कंपनीने निश्चित केलेल्या मनोऱ्यासाठी रु.३०२५/- व वाहिनी खालील जमिनीसाठी निश्चित करण्यात आलेला दर बाजारभावापेक्षा कमी नाही.
(३) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**विधान भवन :**
**मुंबई.**

**जितेंद्र भोळे**
**सचिव-१ (कार्यभार),**
**महाराष्ट्र विधानसभा.**

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.